बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ५२ | बुधवार,दि.३० नोव्हेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

तिसऱ्या अपत्यानंतरही नोकरी सुरूच शासन निर्णयाला ठेंगा

गोंदिया: राज्य शासनाने लहान कुटुंब नियम २००५ कायदा २८ मार्च २००५ राज्यात लागू केला. त्यानुसार शासकीय सेवेत गट अ,ब,क,ड संवर्गाच्या पदाच्या सेवा प्रवेशासाठी २८ मार्च २००५ रोजी राज्यपालांनी अधिसूचना जारी केली. या अधिसुचनेनूसार राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील नागरी किंवा इतर कोणत्याही सेवत असलेल्या कर्मचाऱ्याचे २००६ नंतर तिसरे अपत्य जन्माला घातल्यास संबंधितांची सेवा समाप्त करण्याचे आदेश देण्यात आले होते. गोंदिया जिल्ह्यात तिसरे अपत्य असलेले शेकडो लोक आहेत. परंतु कारवाई कोणत्याही खात्यांतर्गत करण्यात आलेली नाही. शासकीय सेवेत संवर्गात असणाऱ्या अ,ब,क,ड कर्मचाऱ्यांना २८ मार्च २००५ नंतर तिसरे अपत्य झाल्यास त्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याचा नियम आहे. सन २००५ नंतर तिसरे अपत्य असलेले शेकडो कर्मचारी जिल्हा परिषद अंतर्गत देत आहेत. त्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यासाठी मागे जिल्हा परिषदेने कडक पाऊल उचलली होती. परंतु अधिकाऱ्यांचे खिसे गरम झाल्याने कारवाई थंडावली. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र शासकीय नोकरीला लागताना द्यावे लागते.

तक्रार कोठे व कशी करायची

ज्या शासकीय कार्यालयचा प्रमुख आहे. त्याच्याकडे याबाबत कुणीही तिसऱ्या अपत्याबाबत तक्रार करु शकतो. जिल्हा परिषद, पंचायत समितीमधील कृणा कर्मचाऱ्याबाबत तक्रार करायची असेल ती मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्याकडे करता येईल. तालुका किंवा जिल्हा पाताळीवरील ज्या त्या कार्यालयाचा प्रमुखाकडे ती तक्रार करता येते.

काय सांगतो कायदा

३१ डिसेंबर २००५ नंतर ज्यांना तिसरे अपत्य आहे. अशी व्यक्ती शासकीय नोकरीसाठी अपात्र ठरते.

जर शासकीय सेवत असताना एखाद्याच्या घरी तिसरे अपत्य जन्माला आला तर त्याची सेवा समाप्त करण्यात येते.

तिसरे अपत्य नाही, असा दाखला देऊनही तिसरे अपत्य असल्याचे पुढे आले तर त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो.

कारवाई का नाही?

तिसऱ्या अपत्याचा मुद्दा गोंदिया जिल्ह्यात सुरु झाल्यावर कर्मचारी, अधिकारी, वरिष्ठांकडे माहितीच देत नाही.जिल्हा परिषदेने तिसरे अपत्य नसल्याचे शपथपत्र मागितले परंतु अनेकांनी शपथपत्रात खोटी माहिती दिली.तिसऱ्या अपत्यामुळे सेवा समाप्त होऊ नये म्हणून कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना पैसे देऊन मॅनेज करीत असल्याची चर्चा असून माहिती अधिकारातही या लोकांची माहिती काहींनी घेतल्याचे वृत्त आहे.

आधी रस्त्यांचे काम;मग "भूमिगत'चा दाम



गोंदिया–भूमिगत गटार योजनेसाठी शहरभर खोदून ठेवलेले रस्ते आधी दुरुस्त करा. या कामाची तपासणी केल्याशिवाय बिलातला एक पैसाही मिळणार नाही,फ असा सणसणीत इशारा दिल्याशिवाय कंत्राटदाराला जाग येणार नाही.मात्र पालिकेचे मुख्याधिकारीच नॉटरिचेबल राहत असल्याने आणि जिल्हाधिकारी यांचे शहरातील समस्यांशी काही देणंघेणंच नसल्यासारखे असल्याने कंत्राटदाराने भूमिगत गटार योजनेच्या नावावर शहरातील रस्त्यांना खड्डेमय करुन ठेवले आहे.

शहरातील अनेक नागरिक वारंवार या कामाबद्दल आवाज उठवत असतनाही प्रशासनाच्या कानात आवाज न जाणे म्हणजे बहिऱ्या प्रशासनासमोर तुतारी वाजवण्यासारखी अवस्था झाली आहे.त्यातच शहराच्याच नव्हे तर जिल्ह्याच्या विकासासाठी आम्हीच काम केल्याचा गवगवा करणारे आपल्या शहराला स्वच्छ सुंदर बनविण्यासाठी मात्र पाहिजे तसे पुढे आलेले नाहीत.

शहरात एकीकडे भूमिगत गटार योजनेचे काम सुरु असतानाच नव्या वसाहतीमध्ये सिमेंटीकरण रस्त्यांचेही काम मोठ्याने सुरु आहे.जेव्हा की त्या ठिकाणी रस्ते तयार झाल्यानंतर ही बिनकामाची भूमिगत गटार योजना अवघ्या महिन्या दिडमहिन्यात जाऊन त्या रस्त्याची वाट लावणार आहे.अशावेळी लोकप्रतिनिधी व कंत्राटदारांने पालिका प्रशासनासोबतच महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय करुन नवीन रस्ता तयार करण्याआधी त्याठिकाणी ही भूमिगत गटार योजनेचे काम करायला हवे,परंतु शहरात असे कुठेच होतांना दिसून येत नाही.

भूमिगत गटार योजनेचे काम ज्या वार्डात केले जाते,त्याठिकाणी अनेकदा रस्ता पूर्ववत न केल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.त्यातच खोदकामानंतर टाकलेल्या मातीमुळे सतत उडणारी धूळ, खडबडीत झालेला रस्ता यामुळे या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या अक्षरश: नाकीनऊ आले आहेत.सिमेंट क्राँक्रिटच्या नावावर लिपापोतीचे काम करुन रस्ता बुझविण्याचा प्रकार सध्या शहरात सुरु असून अनेकदा वाहने फसल्याचे चित्र आहेत.

नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी कागदोपत्री नेहमीच फिल्डवर असतात मात्र कुठल्या फिल्डवर असतात हे गटार योजनेच्या निमित्ताने फुटलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीवरुनही बघावयास मिळते.नगरपरिषदेमध्ये प्रशासक राज असल्याने मुख्याधिकारी यांना मोकळीक मिळाली असून त्यांनीही नगरपरिषदेच्या कार्यालयाकडे फिरकणेच बंद केल्याने नागरिकांनीही तक्रार कुणाकडे करावी असा सुर उमटू लागला आहे.विशेष म्हणजे मुख्याधिकारी जनतेसाठी उपलब्ध नसले तरी काही विशिष्टासांठी ते नेहमीच तत्पर असल्याचेही बोलले जाते.

सध्या सिव्हील लाईन भागात हनुमान मंदिर ते बाजपेयी ड्रायव्हीगं स्कुल,तिकडे जिल्हा न्यायालयाच्या परिसरात भूमिगत गटार योजनेच्या कामासाठी या रस्त्यावर पाइप टाकण्यासाठी एकाच वेळी तीन ठिकाणी खोदकाम सुरू करण्यात आले होते. यातील काम सपल्यानंतरही या ठिकाणचा रस्ता पूर्ववत करण्यात आलेला नाही. खोदकामात निघालेली माती पाईपलाईनकरिता खोदलेल्या नालीतच घातल्याने आणि त्याठिकाणी पाणी साचल्याने त्या रस्त्यावरुन जाणारा ट्रक्टरही फसल्याचे चित्र आज बघावयास मिळाले.यावरुन रस्ता बांधकामाबद्दल कंत्राटदार कशापध्दतीने हलगर्जीपणा करतो हे उघड्या डोळ्याने जनता बघत आहे.

त्यामुळे गोंदिया विधानसभा नामक सोशल मिडियावरील गृपने खासदार सुनिल मेंढेकडे यांच्याकडे या समस्येचा सोमवारला पाढा वाचला.आणि आज मंगळवारला त्या कामाची पाहणी एमजेपीचे कार्यकारी अभियंत्यासोबत पाहणी केली.त्या पाहणीदरम्यानही त्यांना भयावह अशा चुका आणि निकृष्ठ बांधकामाचे चित्र बघावयास मिळाले.यावेळी एमजेपीचे कार्यकारी अभियंता,माजी नगरसेविका भावना कदम,इरफान सिद्दीकी यांच्यासह अनेकांनी या रस्त्याची पाहणी करुन अधिकाऱ्यांसमक्ष कशापध्दतीने खोदलेल्या नालीची पायाभरणी न करता ३ इंचीचे कच्चे काँक्रिटकरुन नाली बंद करण्यात येत असल्याचे निदर्शनास आणून दिले.सोबतच या नालीमुळे मोटारसायकलस्वारांना अपघात होऊन जखमी झाल्याने त्यांच्यावर आर्थिक भुर्दंडही यामुळे सनह करण्याची वेळ आल्याचे दाखविले गेले. भूमिगत गटार योजनेच्या बांधकामासोबतच शहरातील रस्त्यावर पडलेल्या खड्यामुळे आणि खोदकामामुळे कित्येकांना दमा, खोकला यांसारख्या आजारांचाही त्रास होऊ लागला आहे. हा रस्ताही एकसमान नसल्याने खडबडीत रस्त्यावरून वाहने नेताना हादरेही बसत आहेत.जिल्हाधिकारी,जिल्हा परिषद,न्यायालय व नगरपरिषद अधिकारी, लोकप्रतिनिधी याच रस्त्यावरून ये–जा करत असतात, मात्र तरीदेखील कोणीही नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत नसल्याने तीव्र नाराजी प्रकट केली जात आहे. शहरातील ङ्गभूमिगत गटार योजने अंतर्गत ड्रेनेज लाइन टाकण्याचे काम हे निकृष्ठ पध्दतीचे होत असून याकरीता टाकण्यात येत असलेला पाईपमुळे भविष्यात ही योजनाच अपयशी ठरणार आहे.ड्रेनेज लाइन टाकण्यासाठी अनेक रस्ते खोदून ठेवले, पण अद्याप ते सुस्थितीत आणले नाहीत. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

जंगली हत्तींचा कळप नागझिऱ्याकडे वळला

साकोली: गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया आणि गोंदियातून भंडारा जिल्ह्यात आलेला सुमारे २३ रानटी हत्तींचा कळप आता कोका अभयारण्य, न्यू नागझिऱ्याच्या दिशेने कूच करीत आहे. राष्ट्रीय महामार्गापासून तीन किलोमीटर अंतरावर मोहघाटाच्या जंगलात सध्या त्यांचा मुक्काम आहे.

दिवसभर विश्रांती आणि रात्रीचा प्रवास करणाऱ्या हत्तींनी महामार्ग ओलांडल्यास ते न्यू नागझिऱ्यात आज रात्रीच प्रवेश करू शकतात. बंगालचे पथक आणि स्थानिक वनखात्याचे अधिकारी, कर्मचारी या हत्तींचा मागोवा घेत आहेत. बंगालचे पथक वनखात्याला मार्गदर्शन करत असून त्यानुसार हत्तींचा मागोवा घेतला जात आहे. नागझिऱ्याच्या जंगलात कधीकाळी हत्तींचे वास्तव्य होते. त्यामुळे या हत्तींनी नवीन नागझिऱ्यात प्रवेश केल्यास ते अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. मात्र, अतिउत्साही गावकऱ्यांना या हत्तींपासून दूर ठेवण्यासाठी वनविभागाला चांगलीच मशागत करावी लागत आहे.

साकोली वनपरिक्षेत्रातील सानगडी वनक्षेत्रात रविवारी रात्री हत्तीच्या कळपाचे आगमन झाले असून, थोड्या प्रमाणात शेतकऱ्यांचा नुकसान केले आहे. रात्रीच्या सुमारास हत्तीचा कळप सानगडी वनक्षेत्रातील झाडगाव, केसलवाडा, पापडा, शिरगाव, सिरेगाव गावाशेजारील शेतशिवारात झाली. शेतकऱ्यांनी शेतातील उभे धान पीक कापून त्याचे पुंजणे शेतात ठेवले होते. त्या पुंजणांची या हत्तीचा कळपाने धानाच्या पुंजनाचेसुद्धा नुकसान करण्यात केले आहे. या घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक रोशन राठोड, वनपरीक्षेत्राधिकारी संजय मेंढे, तहसीलदार रमेश कुंभरे व वनविभाग तथा महसूल विभागाची चमू सानगडी येथे तळ ठोकून आहे. महसूल व वनविभाग नुकसानीचे पंचनामे करीत असून, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी प्रयत्नरत आहे. हत्तीच्या आगमनामुळे या परिसरात भीती व त्यांच्या दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

हत्तींचा कळप नेमका कोणत्या जंगलातील कोणत्या भागात आहे. याबाबत सध्या वन अधिकाऱ्यांना माहिती नसल्यामुळे आज रात्री वन विभागातर्फे थर्मल ड्रोन द्वारे हत्तींच्या कळपाची माहिती घेतली जाणार असून हत्तींच्या कळपाद्वारे होणारी संभावित हानी टाळता येईल. आज रात्री शोध मोहीम वनविभाग करणार आहे.

अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच पादचारी पूल कोसळला!; दोन अधिकारी निलंबित

चंद्रपूर– बल्लारशा रेल्वे स्थानकावरील पादचारी पूल दूर्घटनेप्रकरणी रेल्वे विभागाने इन्स्पेक्टर ऑफ वर्क (आयओडब्ल्यू)जी.जी. राजुरकर व याच पदावरील तत्कालीन अधिकारी विनयकुमार श्रीवास्तव या दोघांना निलंबित केले आहे.सात महिन्यांपूर्वी या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले होते. मात्र, ते योग्य पद्धतीने केले गेले नाही. रेल्वे अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच ही दुर्घटना घडली, असा आरोप आता होत आहे.सात महिन्यांपूर्वी स्ट्रक्चरल ऑडिट झाले तेव्हाच या पुलाच्या काही भागाचे खांब कुजलेले होते.ऑडिटमध्ये याबाबत कुठलीच नोंद नाही. या संपूर्ण प्रकरणात दोन अधिकारी दोषी दिसून आल्याने त्यांच्यावर रेल्वे विभागाने निलंबनाची कारवाई केली आहे.मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील बल्हारशा पादचारी पूलाचा प्रिकास्ट स्लॅब निखळल्याने झालेल्या दुर्घटनेत निलीमा रंगारी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत, मुला–मुलींच्या शिक्षणाचा खर्च, पतीला रेल्वे विभागात कंत्राटी नोकरी देण्याचे लिखित पत्र रेल्वे विभागाने दिले आहे.तसेच राज्य सरकारने मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रूपये दिले आहे, तर ९ गंभीर जखमींना प्रत्येकी १ लाख आणि ५ सामान्य जखमींना प्रत्येकी ५० हजार, असे एकूण १६ लाख ५० हजारांचे सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. पादचारी पूलाचे दुरूस्तीचे काम वेगाने सुरूअसून लवकरच ते पूर्ण होईल. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाने दिलगीरी व्यक्त केली आहे.

कालबाह्य वाहनातून प्रवासी वाहतूक

गोंदिया– : जिल्ह्यात सर्रास प्रवाशांची अवैध वाहतूक करणारी वाहने रस्त्यावर धावत असून, याकडे वाहतूक विभागाचे दुर्लक्ष होत आहे.त्यातच अवैध प्रवासी वाहतूक करणारी अनेक वाहने कालबाह्य आणि भंगार असल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. या प्रकाराकडे पोलीस आणि परिवहन विभाग मात्र डोळेझाक करीत आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे.हे अवैध प्रवासी वाहतूक करणारी अनेक वाहने जिल्हा,राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर सुसाट वेगाने धावताना दिसतात.एका वाहनामध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट ते तिप्पट प्रवाशांना बसविण्यात येते.वाहनामध्ये कोंबून प्रवाशांना बसविल्या नंतर

त्या वाहनाच्या व्दारावरही प्रवाशांना बसविण्यात येते.गेल्या कित्येक वर्षां पासून जीप,मिनीडोअर,आटोरिक्षा,काळी–पिवळी,कूझर या सह इतर वाहनातून अवैध प्रवासी वाहतूक केली जात आहे.प्रवासी मिळविण्याच्या नादात ही वाहने भरधाव पळविली जातात.यातील अनेक वाहने तर १० ते १५ वर्षे जुनी आहे.काही वाहने खिळखिळी झाली आहे; मात्र कशाचीही तमा न बाळगता चालक बिनधास्तपणे वाहन पळवित आहेत.

अनेक वाहनांच्या आतील सर्व रचनाच बदलण्यात आली असून, अधिकाधिक प्रवासी नेता यावेत म्हणून प्रवाशांना धड बसता ही येत नाही अशी आसने तयार करण्यात आली आहेत. नऊ आसन क्षमतेच्या वाहनात १५ ते २० प्रवासी कोंबले जातात,तर वाहनाच्या मागे आणि व्दारावर पाच ते सात प्रवासी दिसून येतात.चालकाच्या शेजारीही चार प्रवासी बसविले जातात.त्यामुळे चालकाला गेअर बदलविणेही अशक्य होते.या प्रकारामुळे एखादवेळी भीषण अपघात घडून मोठी जीवित हानी होण्याची शक्यता आहे.हा सर्व प्रकार पोलीस आणि परिवहन विभागाला माहीत आहे; मात्र ते वाहन चालकांवर कारवाई करताना दिसत नाही.

अनेक वाहनांवर तर विना परवाना चालक वाहन चालविताना दिसतात.एक–दोन महिने कंडक्टर असलेला तरुण एका रात्रीतून चालक होतो आणि मोठ्या ऐटीत वाहन चालवितो.अशा तरुणांची सध्या मोठी गर्दी झाली आहे.भरधाव वेगाने वाहन चालविताना रस्ता कसा आहे याचीही तमा बाळगली जात नाही.रस्त्यातील खड्ड्यातून वाहन सारखे उसळत असते.एकीकडे जिल्ह्यातील बहुतांश मार्गावर जीवघेणे खड्डे निर्माण झाले आहेत. या खड्ड्यांतून प्रवास करताना अनेकांना त्रास होत आहे.अशा स्थितीत कालबाह्य वाहनांतून प्रवास करताना जीव मुठीत ठेवावा लागतो.

जिल्ह्यातील धरणात मुबलक पाणीसाठा,पाणीटंचाईवर होणार मात

गोंदिया:– जिल्ह्यात यावषी जोरदार पावसाची हजेरी राहिल्याने जिल्ह्यातील सर्वच धरणामध्ये मुबलक पाणीसाठी उपलब्ध आहे.त्यामुळे येत्या उन्हाळ्यात जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची समस्या उदभवण्याची सध्यातरी शक्यता दिसून येत नाही.त्यातच गेल्या तीनवर्षापासून ओव्हरफ्लो न झालेला इटियाडोह धरणही यावषी ओव्हरफ्लो झाल्याने हे धरण सुद्दा भरले आहे. विशेष म्हणजे धापेवाडा उपसा सिंचन योजना वैनगंगा नदीवर तयार करण्यात आली असून या योजनेतून ७० दलघमी पाणी हे अदानी विज प्रकल्पासाठी शासन धोरणानुसार आरक्षित करण्यात आले आहे.ते पाणी वगळून पिण्याच्या पाण्यासाठी ४४.०५ दलघमी प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा आहे.त्यापैकी २०.०८३ दलघमी पाणीसाठा पिण्यासाठी उपयुक्त असून ४५.५९ टक्केवारी आहे.यातील तुमसर नगरपरिषदेकरीता २.६८ दलघमी पाणी घरगुती वापरासाठी आरक्षित करण्यात आले आहे.या उपसा सिंचन योजनेतून तिरोडा येथील अदानी समुहाच्या वीज प्रकल्पाकरीता पाणी आरक्षित करण्यात आले आहे.

जिल्ह्यात परतीच्या पावसाने सुध्दा यंदा चांगली हजेरी लावली.त्यामुळे जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात भरपूर पाणी साठा आहे.त्यामुळे जिल्ह्यात समाधानकारक पावसाची नोंद झाली आहे.परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने जिल्ह्यातील लघु मध्यम व मोठे सिंचन प्रकल्पातील सिंचन साठ्यात १०० टक्के पाणीसाठा उपबल्ध असून मागील वषीच्या तुलनेत वाढ झाली आहे.त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात घेण्यात येणा?या पिकांना निश्चितच फायदा होणार आहे.सोबतच पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवरही मात होणार आहे.

धरणातील जलसाठा –इटियाडोह धरणात ९८.२६ टक्के,सिरपूर धरणात ९८.२२ टक्के, पुजारीटोला धरणात ९७.७९ टक्के,कालीसराड धरणात ९६.८७ टक्के.
मध्यम प्रकल्प– कलपाथरी प्रकल्प १०० टक्के,कंटगी प्रकल्प १०० टक्के,ओवारा प्रकल्प १०० टक्के,बेवारटोला प्रकल्प १०० टक्के.

जिल्ह्यात सिंचन सुविधेच्या दृष्टीने ९ मध्यम प्रकल्प,२२ लघु प्रकल्प तर ४ मोठे धरण यांच्यासह गोंदिया पाटबंधारे विभागांतर्गत येणारे ३८ जुने मालगुजारी तलाव अस्तित्वात आहेत.या मध्ये बोदलकसा,रेगेपार, संग्रामपूर,चोरखमारा,चुलबंद, खैरबंधा,रेंगेपार,मानागड,संग्रामपूर,कटंगी व कलपाथरी असे एकूण ९ मध्यम प्रकल्प तर आक्टीटोला,भदभद्या,डोंगरगाव,गुमडोह,हरी,कालीमाटी,मोगरा,नवेगावबांध,पिपरिया, पांगडी, रेहाडी,राजोली, रिसाला,सोनेगाव, सालेकसा,सडेपार, सेरपार,वडेगाव,जुनेवानी,उमरझरी,ओवारा,बेवारटोला अशी २२ लघु प्रकल्प आहेत.

यंदाच्या खरीप हंगाम सरासरीच्या तुलनेत समाधानकारक पाऊस पडला त्यामुळे धरण, मध्यम व लघु प्रकल्पात २१ नोव्हेंबरपर्यंतचा विचार करता जिल्ह्यातील मध्यम प्रकल्पात ९४.६० टक्के साठा उपलब्ध आहे. २० लघु प्रकल्पात ९५.३१ टक्के जलसाठा उपलब्ध असून ३८ जुन्या मालगुजारी तलावात यंदा ९२.८० टक्के साठा उपलब्ध आहे.

पाणीपुरवठा योजनेकरीता पाणी आरक्षित

वैनगंगा नदीतील पाणी गोंदिया नगरपरिषदेकरीता ६.६०० दलघमी,तर तिरोडा नगरपरिषदेकरीता०.७८० दलघमी सोबतच गोंदिया एमआयडीसीकरीता ०.२० पिण्याच्या पाण्यासाठी व ०.३६० दलघमी औद्योगिक वसाहतीसाठी राखीव करण्यात आले आहे.सिरपूर धरणातील २.९३ दलघमी पाणी देवरी एमआयडीसीकरीता राखीव करण्यात आले आहे.इटियाडोह धरणातील ३.०७२ दलघमी पाणी हे पिण्यासाठी आरक्षित आहे.या धरणातून भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर पाणी पुरवठा योजनेला पाणी दिले जाते.

गोंदियातही होऊ शकते बल्लारशासारख्या घटनेची पुनरावृत्वती!

गोंदिया : रेल्वे स्थानकावरील पादचारी पूलू कोसळून १७ जण गंभीर झाल्याची घटना रविवारी (दि.२७)चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा रेल्वे स्थानकावर घडली. या घटनेमुळे रेल्वे स्थानकावरील जीर्ण झालेल्यापादचारी पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तर गोंदिया रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक ५ वर तयार करण्यात आलेल्या अरुंद पादचारी पुलामुळे या पुलावर प्रवाशांची कोंडी होऊन हा पूल कोसळण्याची शक्यतानाकारता येत नाही. पण याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने येथेही बल्लारशासारख्या घटनेचीपुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.हावडा–मुंबई मार्गावरील गोंदिया रेल्वे स्थानक हे एक महत्त्वपूर्ण रेल्वे स्थानक आहे.

या रेल्वे स्थानकावरएकूण सहा फलाट असून सहाही फलाटांवर ये–जा करण्यासाठी पादचारी पुलाची व्यवस्था रेल्वे प्रशासनानेकेली आहे. चार वर्षांपूवी फलाट क्रमांक पाच आणि सहावर जाण्यासाठी रेल्वे प्रशासनाने पादचारी पूल तयार केला.पादचारी पूल तयार करताना या पुलावरून ये–जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या विचारात घेणे आवश्यक होते. विशेष म्हणजे याच फलाटावर विदर्भ एक्सप्रेस, महाराष्ट्र एक्सप्रेससह काही लोकल आणि पॅसेंजर गाड्यासुद्धा थांबतात. या गाड्या गोंदियापर्यंत असल्याने सर्वच प्रवासी येथेच उतरतात. त्यामुळे या पादचारीपुलावर एकाच वेळी प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गदी होते. त्यातच पादचारी पूल फारच अरुंद असल्यानेअनेकदा या ठिकाणी प्रवाशांची कोंडी होते. तर पुलावर प्रवाशांची गर्दी वाढून हा पूल कोसळण्याची शक्यतासुद्धा नाकारता येत नाही. या पादचारी पुलाचे रुंदीकरण करण्यात यावे अशी मागणी प्रवाशांनीअनेकदा रेल्वे विभागाकडे केली. पण त्यांनी याची अद्यापही दखल घेतली नसल्याने रेल्वे विभागालाबल्लारशासारख्या घटनेची पुनरावृत्ती होण्याची प्रतीक्षा आहे का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

संपादकीय

भारतीय संविधान आणि मूलभूत अधिकार

भारतीय संविधानाचा ७३ वा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला.आपल्या भारत देशात २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली.२६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटनेची देशात अंमलबजावणी करण्यात आली.सन २०१५ पासून भारतीय राज्य घटनेबाबत जनजागृती करण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून देशात साजरा करण्यात आला. त्याआधी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २४ नोव्हेंबर २००८ रोजी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे आदेश काढले होते.

त्यावेळी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची पोस्टर तयार करून शहरातील सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आली होती. ७३ वा भारतीय संविधान दिन विविध कार्यक्रमांनी साजरा जरी केला तरी आजही देशातील सर्वसाधारण जनता न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. जर भारतीय संविधानाची देशात काटेकोरपणे अंमलबजावणी झाली असती तर देशाचे चित्र वेगळे दिसले असते. त्यासाठी आजच्या ७३ व्या वर्धापन दिनी आपले मूलभूत अधिकार समजून घेऊ.देशाच्या स्वातंत्र्यानंतर देशात वेगवेगळ्या समित्या नियुक्त करण्यात आल्या. त्यामधील अतिशय महत्त्वाची समिती म्हणजे "मसुदा समिती" होय. ही सात सभासदांची समिती असून यातून २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सर्वानुमते मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीत मुन्शी, मुहम्मद सदुल्ला, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, टी. टी. कृष्णम्माचारी आणि डी. पी. खेतान सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्तिगत मेहनत घेऊन भारतीय राज्यघटना लिहिली. त्याचमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. भारतीय राज्य घटनेमध्ये ३९५ कलमे, ८ परिशिष्टे आणि २२ प्रकरणे होती. त्यामुळे ती जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे.

आता नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा विचार करू एखादी व्यक्ती अब्जावधी असो किंवा दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारी असो, "एक व्यक्ती एक मत" हा भारतीय राज्यघटनेने सर्वांना दिलेला अतिशय महत्त्वाचा मूलभूत समानतेचा अधिकार आहे. भारतीय संविधानामध्ये त्यांचे अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांची कर्तव्ये सांगितली आहेत. मूलभूत हक्कांचा उद्देश वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करणे हा आहे. तेव्हा एक भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकांनी भारतीय राज्यघटना वाचून आपले मूलभूत अधिकार मिळवले पाहिजेत.

भारताच्या संविधानामध्ये स्वातंत्र्य (कलम १९-२२), कायदा (कलम २०), शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम २३ व २४), धर्मस्वातंत्र्य (कलम २५-२८), अल्पसंख्याकांचे अधिकार (कलम २९ व ३०) आणि घटनात्मक तक्रारींचा अधिकार (कलम ३२-३५) हे अतिशय महत्त्वाचे मूलभूत अधिकार नागरिकांना आहेत.

भारतीय राज्य घटनेतील नागरिकांच्या मुख्य अधिकारापैकी समानतेचा अधिकार कलम १४-१६ मध्ये समानतेची तत्त्वे सामाविष्ट करण्यात आली असून कलम १७-१८ यात एकत्रितपणे सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान मांडण्यात आले आहे. स्वातंत्र्य हा लोकशाहीने पाळलेला सर्वात महत्त्वाचा आदर्श असल्याने समाज स्वातंत्र्याचा अधिकार कलम १९-२२ यामध्ये आहे. उदाहरणार्थ भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शस्त्राशिवाय एकत्र येण्याचे स्वातत्र्य, सहवासाचे स्वातंत्र्य, कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, देशाच्या कोणत्याही भागात राहण्याचे स्वातंत्र्य इत्यादींचा समावेश आहे. कलम २३-२४ मध्ये शोषणाविरुद्धचा अधिकार नमूद करण्यात आले आहेत. यात समाजातील दुर्बल घटकांचे शोषण रोखण्यासाठी तरतुदी केलेल्या आहे.याची जाणीव दुर्बल घटकांना करून द्यावी. कलम २३-२८ मध्ये धर्म स्वातंत्र्याचा अधिकार समान असल्याचे सुनिश्चित करण्यात आले आहेत. देशातील सर्व धर्मांना दिलेला आदर असून हे भारतीय राजकारणाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप दर्शवते. प्रत्येकाला व्यक्ती स्वातंत्र्य आहे. त्यामुळे ते कोणताही व्यवसाय तसेच प्रचार करू शकतात. कलम २९-३० मध्ये सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांचा समावेश आहे.

यात देशातील नागरिकांना घटनात्मक उपायांचा अधिकार समजून घेतला पाहिजे. यासाठी प्रामाणिकपणे भारतीय संविधानाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अधिकार असून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात आदिवासी दलित वस्तीतील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास त्याला गावातील सार्वजनिक स्मशानभूमीत प्रेत जाळायला दिले जात नाही किंवा सार्वजनिक विहिरीवर पाणी भरायला विरोध केला जातो. याला स्वातंत्र्य म्हणायचे काय? आजही दलित आदिवासी समाजामध्ये त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होते ही वस्तुस्थिती आहे.

याचा अर्थ असा की, आजही देशात भेदभाव दिसून येतो. तेव्हा देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून भारतीय संविधानाच्या नियमांचे पालन करून आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठी आणि स्वातंत्र्यासाठी तयार केलेल्या भारतीय राज्य घटनेचे ७३ व्या भारतीय संविधान दिनाच्या वर्धापनदिनी वचनबद्ध होऊया. तेव्हा भारत हा तरुणांचा देश म्हणून वाटत असले तरी आपल्या देशाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात रुबाबात प्रवेश जो केला त्याचे एकमेव कारण म्हणजे "भारतीय संविधान" होय. त्यासाठी भारतीय संविधान आणि प्रत्येकाचे मूलभूत अधिकार समजून घ्यायला हवेत.

कुडवा व सोनपूरी येथील अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश

गोंदिया-राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली, गोंदिया येथील जनसंपर्क कार्यालयात माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम कुडवा व सोनपूरी येथील अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ग्राम कुडवा येथील सर्वश्री सोमेश उपवंसी, गौरव पटले, सावन चौधरी, नूतन तांडेकर दिगंबर देशमुख, आशिष बावनथडे, अशपाक शेख, पुरुषोत्तम बोपचे, विकास खोटेले, देवा पटले, वसिम शेख, सोहम शेंडे, शाहरुख शेख, राहुल नेवारे, पंकज राऊत, सुशील पटले, सचिन पटले, भीम राऊत, भूमेश्वर राऊत, देवेंद्र माटे, सुमित चौरे, दीप रहांगडाले, राहुल बडोले तसेच सोनपुरी येथील सर्वश्री रमेश धनराज धुवारे, महेंद्र रामचंद धुवारे, योगराज कपूरचंद धुवारे, ओमराज ओमकार साव चौरागडे, भैय्यालाल नत्थू चौरागडे, लॉमेंद्र ओमप्रकाश तुरकर, बुधरामजी जियालाल कावळे, जागेश्वर रहांगडाले सहीत अन्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. माजी आमदार जैन यांच्या हस्ते पक्षाचा दुपट्टा घालून सर्वांचे स्वागत करण्यात आले. केले व या प्रवेशामुळे पक्ष संघटना मजबूत व पक्षाची ताकद वाढणार आहे. पक्षाची ध्येय धोरणे व कार्य तळागळापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध राहाल या सह पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.या यावेळी सर्वश्री माजी आमदार राजेंद्र जैन, रविकांत बोपचे, बाळकृष्ण पटले,लोकपाल गहाणे, केतन तुरकर,उध्दव मेहंदळे, पवन पटले, संतोष लिलारे, राजू बावनथडे, महेश तांडेकर, सुनील पटले, शैलेश वासनिक,नागरत्न बंसोड, रौनक ठाकूर, कपिल बावनथले,सोनू येडे,नरेंद्र बेलगे सहित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

जाणून घेऊ या भारताचे संविधान

भारत हा जगातील सर्वात बलवान लोकशाही असलेला देश आहे असे आपण नेहमीच म्हणतो. आणि ते खरेही आहे. आपल्या देशाचा राज्यकारभार ज्या नियम कायद्यानुसार चालतो ते म्हणजे आपले संविधान भारताची राज्यघटना. सर्वसमावेशक व सर्व न्यायी राज्य घटनेमुळेच भारताची जगात वेगळी ओळख आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला हे संविधान दिले आहे. प्रत्येक नागरिकांच्या घरात हे संविधान असायलाच हवे. २६ नोव्हेंबर या संविधान दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या संविधाना विषयी जाणून घेऊ या. खरे तर संविधानाच्या उद्देशिकेमध्येच याचा सार आहे. न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता यावर आधारित आपले संविधान आहे. राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ अंमलात आली. उद्देशिकेतील "हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करित आहोत" या ओळीतच संविधानाचे मूल्य अधोरेखित केले आहे.

भारतीय संविधानात २२ भाग (प्रकरण), १२ अनुसूचि व दोन परिशिष्ट आहेत. दोन परिशिष्ट ही जम्मू काश्मीरसाठी आहेत. संविधानाची सुरुवात उद्देशिकेने होते. भाग एक मध्ये संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र याबाबत माहिती दिली आहे. भाग दोन मध्ये नागरिकत्वाची सविस्तर व्याख्या नमूद करण्यात आली आहे. मूलभूत हक्कांबाबतचा उल्लेख भाग तीन मध्ये आहे. यात समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्ध हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, संकस्कृतिक व शैक्षणिक हक्क, विवक्षित कायद्याची व्यावृत्ती व संविधानिक उपाय योजण्याचा हक्क या बाबत विवेचन दिले आहे.

राज्य धोरणांची निदेशक तत्वे यावर भाग मध्ये सविस्तर माहिती आहे. भाग पाच हा महत्त्वाचा आहे. यात राष्ट्रपती व उपराष्ट्रपती- मंत्रीपरिषद, संसद, संसदेचे अधिकारी, कामकाज चालविणे, सदस्यांची अपात्रता,



संसद व तिचे सदस्य यांचे अधिकार, वैधानिक कार्यपद्धती, वित्तीय कार्यपद्धती, सर्वसाधारण कार्यपद्धती, राष्ट्रपतींचे वैधानिक अधिकार, संघ न्याय यंत्रणा व भारताचा नियंत्रक व महा लेखा-परीक्षक याविषयी माहिती दिली आहे.

भाग सहा हा राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. कार्यकारी यंत्रणा याबाबत यात नमूद करण्यात आले आहे. राज्यपाल, मंत्रीपरिषद, राज्याचा महाधिवक्ता, सरकारी कामकाज चालविणे, राज्य विधानमंडळ, राज्य विधिमंडळाचे सदस्य, सदस्यांची अपात्रता, वित्तीय बाबींमधील कार्यपद्धती, सर्वसाधारण कार्यपद्धती, राज्यपालांचे अधिकार, राज्यांमधील उच्च न्यायालये, दुय्यम न्यायालये यांच्या विषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. भाग सात मध्ये पहिल्या अनुसूचीच्या भाग ख मधील राज्य आहेत. संघ राज्यक्षेत्राबाबत भाग आठ मध्ये तर पंचायती, नगरपालिका, सहकारी संस्था यांच्या विषयीचे नियम भाग नऊ मध्ये देण्यात आले आहेत.

अनुसूचित क्षेत्रे व जनजाती क्षेत्रे याबाबत संविधानाच्या भाग दहा मध्ये उल्लेख आहे. भाग अकरा मध्ये संघराज्य आणि राज्य यामधील संबंध, वैधानिक अधिकाराची विभागणी, प्रशासनिक संबंध, पाण्यासंबंधी तंटे, राज्या- राज्यांमधील समन्वय याविषयी माहिती देण्यात आली आहे. वित्तसंस्था, मालमत्ता व दावे, संघराज्य आणि राज्ये यांच्यामध्ये महसुलांचे वाटप, संकीर्ण वित्तीय तरतुदी, भारत सरकारने व राज्यांनी कर्जे काढणे व मालमत्तेचा हक्क याबाबत भाग बारा मध्ये नमुद आहे. संविधानाचा भाग तेरा हा भारताच्या राज्य क्षेत्रातील व्यापार, वाणिज्य व व्यापार संबंधाने आहे. भाग चौदा मध्ये संघराज्य आणि राज्य यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सेवा विषयी माहिती देण्यात आली आहे. या प्रामुख्याने लोकसेवा आयोग व न्यायाधिकरणे, यांचा समावेश आहे. देशात व राज्यात होणाऱ्या निवडणुकांबाबत भाग पंधरा मध्ये माहिती आहे.

विवक्षित वर्गांसंबंधी विशेष तरतुदी संविधानाच्या भाग सोळा मध्ये दिल्या आहेत. राजभाषा व संघराज्याची भाषा याबाबतचे विवेचन भाग सतरा मध्ये आहे. भाग अठरा हा आणीबाणीसंबंधी तरतुदीचा आहे. भाग एकोणीस हा संकीर्ण आहे. संसदेचा संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार व त्या संबंधीची कार्यपद्धती ही बाब भाग वीस मध्ये नमूद करण्यात आली आहे. भाग एकवीस अस्थायी, संक्रमणकालीन व विशेष तरतुदीचा आहे. भाग बावीस हा संक्षिप्त नाव, प्रारंभ, प्राधिकृत हिंदी पाठ व निरसने यासाठीचा आहे. अशा प्रकारे संविधान बावीस भागात आहे. संविधानात बारा अनुसुच्या सुद्धा समाविष्ट आहेत.

संसदेच्या शिफारशीनुसार संविधानात कालपरत्वे सुधारणा व दुरुस्त्या सुद्धा करण्यात आल्या आहेत. आपले संविधान हे जगात श्रेष्ठ मानले जाते. ते फक्त न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता या घटकामुळे. असे हे संविधान भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाने मराठीत भाषेत उपलब्ध करून दिले आहे. प्रत्येक नागरिकाने संविधानाची एक प्रत आपल्या संग्रही ठेवायलाच हवी. कारण आपला सगळा जीवनप्रवास संविधानाने दाखविलेल्या मार्गानेच पूर्ण होणार आहे.

स्वी गिते जिल्हा माहिती अधिकारी,गोंदिया

अखिल भारतीय पवारी साहित्य सम्मेलन ११ डिसेंबरला पांढुरना येथे

गोंदिया: राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभा प्रणित पवारी साहित्य कला संस्कृती मंडळाच्यावतीने येत्या ११ डिसेंबरला मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील पांढुरना येथे पवार समाज भवनात या आयोजित करण्यात आले आहे. या सम्मेलनाचे सम्मेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यीक ॲड. देवेंद्र चौधरी हे राहणार आहेत. तर उद्घाटक म्हणून माजी आमदार मारोतराव खवसे, व सह उद्घाटक राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभेचे अध्यक्ष इंजि. मुरलीधर टेंभरे उपस्थित राहणार आहेत. या सम्मेलनाचे स्वगाताध्यक्ष पवार समाज संगठन पांढुरनाचे अध्यक्ष भाकचंद देशमुख व सह स्वागताध्यक्ष गणेश मंदिर समितीचे अध्यक्ष तानबाजी बारंगे हे आहेत. या साहित्य सम्मेलनात ज्येष्ठ साहित्यीक बोरकन्हार, जीवन गौरव पुरस्कार ॲड. लखनसिंह कटरे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सम्मेलनाला मुख्य अतिथी म्हणून उद्यानिकी महाविद्यालय छिंदवाडाचे अधिष्ठाता डॉ. विजय कुमार पराडकर, तसेच विशेष अतिथी म्हणून सतपुडा आंचलिक साहित्य परिषदेचे संचालक संजय पठाडे, पवार समाज शिवनी जिल्हाध्यक्ष इंजि. नलिन सहारे, ज्येष्ठ साहित्यीक हेमेंद्र क्षीरसागर, इंजि. राजेंद्र किशोर रहांगडाले, हरीभजन बिरगडे उपस्थित राहणार आहेत. या सम्मेलनात डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे, ॲड. लखनसिंह कटरे, ॲड. देवेंद्र चौधरी, तुकाराम किनकर, यादोराव चौधरी, छगनलाल रहांगडाले,रामचरण पटले यांच्या साहित्य पुस्तकाचे विमोचन करण्यात येणार आहे.तसेच या साहित्य सम्मेलनात

कवि रत्न तुकाराम किनकर, यादोराव चौधरी, सौ. उषाबाई रमेश पटले, गायक रत्न रामचरण पटले, कु. पायल गौतम, लेख रत्न चिरंजीव बिसेन, सी.एच.पटले, पवारी बोली शोधार्थी तुफान सिंह पारधी, इंजि. सुरेश देशमुख आदिंचा गौरव करण्यात येणार आहे. या साहित्य सम्मेनाला समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

तीन तालुक्यातील समस्या मांडणार प्रकर्षाने

देवरी: येत्या महिन्यात महाराष्ट्र विधीमंडळाचे अधिवेशन होणार आहे. देवरी-आमगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार सहेसराम कोरोटे म्हणले की, माझ्या मतदार संघात देवरी, आमगाव आणि सालेकसा या तालुक्यांचा समावेश आहे. यातील देवरी आणि सालेकसा हे तालुके नक्षलरित्या अतिसांवेदनशील आहेत. तालुक्यात अनेक समस्या कायम आहेत. त्याचबरोबर आमगाव तालुक्यातील मुख्य मार्गाची अवस्था दयनीय आहे. आमदार झाल्यानंतर दोन वर्ष कोरोनाचे संकट असल्यामुळे कामे करता आली नाही. आता निर्बंध हटले असूनही राज्य सरकारने निधी रोखून ठेवला. त्यामुळे सर्व समस्या प्रकर्षाने विधीमंडळात मांडणार असल्याचे आमदार कोरोटे यांनी सांगितले. जिल्ह्यातील देवरी-आमगाव मतदार संघात समाविष्ट असलेलञया तीन पैकी दोन तालुके अत्यंत मागासलेले आहेत. या तालुक्यात आदिवासी समज वास्तव्यास आहे. त्याचबरोबर या तालुक्यात नक्षल चळवळ सक्रिय आहे. परिणामी तालुक्यातील दुर्गम भागाचा विकास अद्यापही खोळंबलेला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर कोरोना विषाणू संक्रमणाने पाय पसरले. त्यामुळे शासनाने निधी रोखून ठेवला. त्यातच सत्ताबदल झाला. आता सर्व निर्बंध मागे घेण्यात आले. परंतु विद्यमान सरकारने विरोधी पक्षात असल्यामुळे या विधानसभा मतदार संघातील विकासकामांसाठी नियोजनातील निधी रोखून ठेवला आहे. परिणामी कामे करण्याची मानसिकता आणि इच्छाशक्ती असून देखील कामे करता येत नाही. आता पुढच्या महिन्यात हिवाळी अधिवेशन होणार असून या अधिवेशनात मतदार संघातील मुद्दे प्रकर्षाने आणि संपूर्ण ताकदिनिशी मांडणार आहे.

धान खरेदीची मर्यादा ५० क्विंटल हवी. मतदार संघातील शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी अदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सहकार्याने अदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात येते. मात्र यावर्षी महामंडळाने प्रती शेतकरी २८ क्विंटल अणि प्रती हेक्टर २१ क्विंटलची मर्यादा ठरवून देण्यात आली आहे. त्यामुळे राज्य शासनाचा हा निर्णय शेतकऱ्यांना भिकेला लावून व्यापाऱ्यांना मालामाला करण्याचा आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा हा मुद्दा प्रकर्षाने मांडणार आहे.

चिलमटोला-कुंभली मार्ग व पूल

देवरी तालुक्यातील ककोडीच्या पुढे चिलमटोला, कुंभली हे गावे आहेत. कुंभली या गावात जाण्यासाठी अद्यापही रस्ता नाही. स्थानिक नागरिक डोग्याने प्रवास करुन नाला ओलांडतात. यापुर्वीच्या आमदारांच्या कार्यकाळात रस्त्यासाठी आलेल्या निधीतून रस्ता देखील झला नाही. स्थानिक आदिवासींचा नाला ओलांडताना मृत्यू झाला. आता हा प्रकार पुढे घडणार नाही. यासाठी मी कटीबद्ध असून पक्का रस्ता अणि मोठा पूल तयार व्हावा याकरिता निधीसाठी अधिवेशनात झटणार असल्याचे आमदार कोरोटे म्हणाले.

आमगाव पालिका व कामठा मार्गासाठी निधी

आमगाव नगरपालिकेची कसलीही आवश्यकता नव्हताअसे असताना देखील तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारने पालिका जाहीर केली. मात्र ते ते प्रकरण अद्यापही न्यायप्रविष्ठ असल्याने निवडणूक झाली नाही. २०१४ पासून पलिकेत समाविष्ट असलेली गावे विकासापासून वंचित आहेत. तत्काळ ते विषय सरकारने मार्गी लावावा. यासाठी सभागृहात आवाज उलचणार आहे. त्याचबरोबर रावणवाडी ते आमगाव ३६५ क्रमांकाच्या राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था झाली असून या मार्गाचे तातडीने बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी यासाठी विषय मांडणार आहे.

मत्स्यव्यवसाय संस्थांना न्याय देणार

सडक अर्जुनी: महाविकास अघाडीच्या हातातून सत्ता जावून शिंदे-फडणवीस सरकारचे शासन राज्यात आले. त्यात येत्या डिसेंबर महिन्यात होत असलेले हिवाळी अधिवेशन हे या सरकारचे पहिले अधिवेशन राहणार आहे. या पार्श्वभुमीवर आपल्या विधानसभा क्षेत्रातील कोणत्या विशेष प्रश्नांना घेऊन विधीमंडळ गाजवणार या अनुषंगाने अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहरराव चंद्रीकापुरे यांनी सांगितले की क्षेत्रातील विविध मुद्यांवर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी विशेषत: जिल्ह्यातील मत्स्यमार संस्थांना शासनाकडून न्याय मिळवून देण्यासाठी तारांकीत प्रश्न करणार असल्याचे सांगितले. आमदार चंद्रीकापुरे म्हणाले की, महाविकास आघाडीची सत्ता राज्यात असताना अनेक विकासात्मक कार्य करण्यात आले. अनेक महत्वाचे निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतले. मात्र सध्याची सरकार सत्तेत येताच अनेक महत्वाच्या निर्णयांना त्यांनी आडकाठी आणली. विशेषत: त्यांनी मत्स्यमार संस्थाविषयी जोर देतांना सागितले की यंदा जिल्ह्याला ओल्या दृष्काळाचा सामना करावा लागला आहे. जिल्ह्यात चार ते पाच वेळ अतिवृष्टीची नोंद करण्यात आली असून अनेक नदीनाल्यांना पूर आल्याचे चित्र होते. यावेळी या पुराच्या पाण्यात मत्स्यमार संस्थाचे मत्स्बीज व विक्रीयोग्य मासे वाहून गेल्याचे वास्तव आहे. मात्र ऑगस्ट २०२२ ला झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाईपासून या मत्स्य संस्था वंचित आहेत. तेव्हा या विषयी आपण शासनाला जाब विचारणार आहे. गोंदिया जिल्ह्यात १,१४५ तलाव असून १३४ मासेमार सहकारी संस्था आहेत. यावर मासेमारी करणाऱ्या समाजाची उपजीविका अतिवृष्टीमुळे संपुष्टात आली आहे. त्यांना न्याय मिळणार का? त्यातच या संस्थांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. शासनाने सदर प्रकरणी तत्काळ मदतीचे आदेश देणे गरजेचे आहे. तर या अनुषंगाने अनेकांनी निवेदनही दिले मात्र त्यावर काय उपाययोजना करण्यात आली. सदर प्रकरणी शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात आली किंवा नाही तर विलंब का? असे अनेक प्रश्न विधीमंडळात मांडणार असल्याचे चंद्रीकापुरे म्हणाले. अर्जुनी मोरगाव हा एक विधानसभा क्षेत्र असले तरी या क्षेत्रात अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी या दोन तालुक्यांसह गोरेगाव तालुक्याचाही काही भाग येत असून या क्षेत्राच्या विकासासाठी आपण सदैव तत्पर आहोत. यात प्रामुख्याने विकासकामांना आपले प्राधान्य असून क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी विधीमंडळात मुद्दे गाजविणार असल्याचे आ.चंद्रीकापुरे म्हणाले.

पापक्षालन: सौ चुहे खाकर बिल्ली चली हज

पापक्षालनाची बात ज्यांनी केली, ते स्वतः पापी लोकांसाठी काम करणारे आहेत, याची एकप्रकारे ते कबुली देत आहेत, तेव्हा सर्वप्रथम त्यांनी त्या पापी चरकातून बाहेर पडावे. तरच त्यांचे सर्व पापी मंडळी ऐकतील. ब्रम्होकंपूनी वैदिक धर्मसूत्राधारे बळकावलेले विशेषाधिकार त्यागून समतेसाठी तमाम शुद्रातिशुद्रांच्या न्यायाच्या बाजूने उभे राहणे, ही बाब पापक्षालनाच्या कार्यक्रम पत्रिकेत अग्रभागी असेल? ज्या कुकर्मांमुळे तुमच्या पिढ्या न पिढ्या पापी झाल्यामुळे तुमचा अखिल ब्रम्हवृंद खजील होत आहे, ती अन्यायी विचारधारा पेरणारी साहित्य संपदा, भेद निर्माण करणारे वेद, पुराण, उपनिषदे, श्रुतीस्मृती ग्रंथ, रामायण, महाभारत यांची कशी विल्हेवाट लावणार? हेही पापक्षालन करताना स्पष्ट केले पाहिजे.

पाप आणि अन्याय यात कसा फरक करणार? पुनःजन्म, पूर्वजन्मातील संचित, पापपुण्याच्या धारणा यावर संभ्रम ज्यांनी पसरवला त्यांनी पापक्षालन करावे म्हणजे पुण्य मिळेल असा दुसऱ्या बाजूने अर्थ घेता येईल. सौ चुहे खाकर बिल्ली चली हज.पण ज्यांच्यावर हजारो वर्षे धर्मसूत्राधारे व्यवस्थेने अन्यायकारक बंधने लादली त्या अन्यायाचं प्रायश्चित्त घेऊन न्यायीपणाने कस वर्तावं याचं मार्गदर्शन या व्यवस्थेच्या लाभार्थ्यांना केलं पाहिजे,अन्यथा मपोटात एक, ओठात एकफ असा पुन्हा नेहमीचाच पाठ.

पापक्षालनाच्या बातमीची शाई सुकते न सुकते तोवर ईडबल्यूएस चे आरक्षण वैध ठरवून टाकले. आर्थिक दुर्बल घटकांना लागू केलेले आरक्षण वैध ठरवताना ओबीसी एससी एसटी वगळून ज्यांची लोकसंख्या १५% समजण्यात आलेली आहे त्यांना १०% आरक्षण देऊन या निकालात कोणता न्याय झाला हा प्रश्न ओबीसींना आता पडू लागला आहे. जातवार जनगणना करा. त्यामुळे समाजाचे वास्तव समोर येईल. मागास कोण आणि प्रगत कोण ते स्पष्ट होईल. 'दूध का दूध, और पानी का पानी' होऊन जाऊ द्या एकदा. अशी काकुळतीने मागणी होत आहे, पण जातवार जनगणनेच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षदा लावल्या. मग १५% उच्चजातीयांमधील गरीब हुडकून कसे काढले आणि त्यांची गरीबी आरक्षणामुळे हटविणे सांविधानिकदृष्ट्या न्यायसंगत बाब ठरते का?

उच्चजातीय हे देशातील सर्वात श्रीमंत आणि सर्वाधिक संपत्ती असलेल्या जाती आहेत...

सचिवालयात सचिव, न्यायाधीश, कलेक्टर,कुलगुरू, प्राध्यापक, ऑफिसर असे उच्च हुद्द्यावर सरकारी व खाजगी क्षेत्रात मॅनेजर, कंपन्यांचे मालक, भांडवलदार, उद्योजक, बडे व्यापारी मोठ्या प्रमाणावर उच्च जातीयांचा कब्जा आहे...

सरकारी नोकरीतील उत्पन्न, मंदिरातील उत्पन्न, खाजगी कारखान्यातील उत्पन्न यामध्ये सर्वाधिक वाटा उच्च जातीयांना मिळतो. आणि सर्व व्यवस्था उच्चजातीच्या अधिपत्याखाली आहे. हजारो वर्षे सामाजिक



आणि शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या म्हणून या जाती गणल्या जातात. ज्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासपणाच्या निकषाच्या आधारे आरक्षण मिळणे वैध ठरवले आहे, त्यात या जाती कुठे बसतात?

यावरून उच्च जातीयांची श्रीमंती लक्षात घेता, एथड आरक्षणाच्या गौडबंगालाचे धुके कमालीचे दाट होत जातात. आरक्षण म्हणजे गरीबी हटाव कार्यक्रम नसून ते समान प्रतिनिधित्व तत्वावर आधारित सामाजिक न्यायाचा भाग ठरते. ज्या सामाजिक घटकांना शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने मागास ठेवण्यासाठी जातीयता कारण आहे, त्या विषमतेच्या विरोधी समताधिष्ठित कार्यक्रम म्हणजे आरक्षण होय. पण १५% च्या मागासपणाचा आधार संवैधानिक चौकटीत तरी कसा बसतो? आणि सामाजिक न्यायाच्या तत्वानुसार नैतिक व वैधानिक दृष्टीने सुसंगत कसा वाटू शकेल?

याउलट संविधानाच्या ३४०,३४१,३४२ या कलमांन्वये ओबीसी, एस सी,एसटी आरक्षण न्यायसंगत आहे. एससी- एसटी प्रमाणे ओबीसी शैक्षणिक व सामाजिक बाबतीत मागास असल्याने संवैधानिक आरक्षण देण्यात आले, पण त्याला क्रीमिलेयर लावून बदमाशी केली, तर केलीच पण आरक्षणाची मर्यादा ५०% च्या वर जाते म्हणून ५२% ओबीसीची २७% वर बोळवण केली.

ज्या उच्च जातीयांना आरक्षणाची गरजच नाही. ज्यांनी हजारो वर्षे जातीव्यवस्थेची मधूर फळं चाखली. ओबीसी दलित आदिवासी आणि अल्पसंख्यांक उच्च जातीयांच्या बरोबरीत येऊ नये म्हणून आरक्षणाचा सातत्याने विरोध केला, त्यांना एथड आरक्षण दिलं.

ओबीसीसाठी संविधानात ३४० कलमानुसार आरक्षणाची तरतूद करण्यात आली. काका कालेलकर आयोग, मंडल आयोग गठीत करण्यात आले. पण संपूर्ण मंडलची अंमलबजावणी होत नाही. ओबीसीला क्रीमिलेअर लावला जातो. आणि ५२% समाजाला केवळ २७% वाटा दिला. ओबीसीची जातवार जनगणना न करताच ठोकताळे. कित्येक वर्षे हेळसांड. आणि एथड साठी न मागता कुणीही संघर्ष न करता सारं आलबेल झालं. ओबीसीवरील हा अन्याय पापक्षालनाच्या कक्षेत आणून दूर करता येईल?

ज्या विषमतावादी विषवल्लीच्या छायेखाली वाढलेली बडबोल कंपू मस्तवालपणे बदला घेण्याची भाषा बोलतात, टिकलीच्या मिषाने स्त्रीदास्याचा दंभ उजळ माथ्याने मिर

महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्काराने गोंदिया जिल्हा सन्मानित

गोंदिया : महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय विशेष पुरस्कार रमाई आवास योजना सर्वोत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार गोंदिया जिल्ह्यास प्राप्त झाला. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत मौजा अदासी ता. जि. गोंदिया येथे मंजूर व बांधकाम पूर्ण झालेल्या नाथजोगी समाजाच्या वसाहतीकरीता अदासी ग्राम पंचायतीस महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय पुरस्कार राज्य पुरस्कृत आवास योजना सर्वोत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील,जिल्हा परिषद अध्यक्ष पकंज रहागंडाले यांनी स्वीकारला.

केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणीमध्ये गतीमानता व गुणवत्ता आणणेसाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनिमित्त राज्यात अमृत महा आवास अभियान -२०२२-२३ राबविण्यात येणार आहे. सदर अभियानाचा शुभारंभ कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शुभ हस्ते, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मंत्री ग्राम विकास व पंचायत राज व इतर मान्यवर यांचे प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमा दरम्यान महाआवास अभियान २०२०-२१ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मुल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना "महा आवास अभियान पुरस्कार व महा आवास अभियान विशेष पुरस्कार" देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात गोंदिया जिल्ह्याचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्रमात प्रसंगी मुख्यमंत्री यांचे हस्ते गोंदिया जिल्ह्यास सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय विशेष पुरस्कार रमाई आवास योजना सवीत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार देऊन गौरव सत्कार करण्यात आला. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत मौजा अदासी ता. जि. गोंदिया येथे मंजूर व बांधकाम पूर्ण झालेल्या नाथजोगी समाजाच्या वसाहतीकरीता अदासी ग्राम पंचायतीस महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय पुरस्कार राज्य पुरस्कृत आवास योजना सर्वोत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार देऊन गौरव सत्कार करण्यात आला.

यावेळी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.शीतल पुंड, प्रकल्प संचालक सौ.प्रमिला जाखडेकर,सभापती मनोज बोपचे,सभापती श्रीमती खोब्रागडे सडक अर्जुनी,उप मुख्य कार्य.अधिकारी बी.डी.हरिनखेडे उपस्थित होते.

पोलिस अधीक्षक कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन

गोंदिया: जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात संविधान दिन व मुंबई येथे आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस अधिकारी/पोलिस अंमलदार व निष्पाप नागरिक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हा पोलिस दल व एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त तसेच मुंबई येथे आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस अधिकारी/पोलिस अंमलदार व निष्पाप नागरिक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, लोक कल्याण कार्यास सहकार्य करण्याकरिता जिल्हा वाहतूक शाखा, उप-मुख्यालय देवरी, पोलिस स्टेशन आमगाव, पोलिस स्टेशन तिरोडा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा पोलिस दलातील अधिकारी/अंमलदार, गृहरक्षक दल, तरुण/तरुणी, सामान्य नागरिक, प्रतिष्ठीत व्यक्ती यांनी स्वेच्छेने व उत्स्फूर्तपणे रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले. जिल्हा वाहतूक शाखा येथे ९० दात्यांनी, उप-मुख्यालय देवरी येथे ९३ दात्यांनी, पोलिस स्टेशन आमगाव येथे ७० दात्यांनी तर पोलिस स्टेशन तिरोडा येथे ७७ दात्यांनी अश्याप्रकारे जिल्ह्यातील एकूण ३३० दात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिरात सहभागी रक्तदात्यांचे जिल्हा पोलीस दल, एच. डी. एफ. सी. बँक येथील चम ू उपस्थित वैद्यकीय चमू, डॉक्टर यांच्यावतीने रक्तदान प्रमाणपत्र देण्यात येऊन गौरविण्यात आले. रक्तदान शिबीराचे यशस्वीरित्या उत्तम आयोजन करण्याकरिता अथक परिश्रम करणारे जिल्ह्यातील पोलीस अधिकारी, पोलिस अंमलदार, त्याचप्रमाणे लोक कल्याण कार्यास सहकार्य करण्याकरिता वैद्यकीय चमू, डॉ. सुवर्णा बहेकार, एच. डी. एफ. सी. बँकचे दिपक पाटील, ब्रांच आपरेशन मॅनेजर ललीत चांडक व मॅनेजर हरिश ठाकरे, डॉ. बबलू चौधरी, विनोद चांदवाणी,बेरार टाईम्सचे संपादक खेमेंद्र कटरे,ओबीसी संघटनेचे कैलास भेलावे,सुनिल भोगांडे,गौरव बिसेन धरम खटवानी, चेतन चव्हाण, काजल सोरते, पल्लवी पटले, रंजना मेश्राम, रुपेश पंधराम, रितीक बारापात्रे, जानकी बोपचे, नितीन पंधरे, फैजाण कुरेशी त्याचप्रमाणे सदर रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्यांचे पोलिस दलाचे वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

देवरी येथील ट्रॉमा सेंटरला लागली घरघर

देवरी: अपघातग्रस्त रुग्णांचा जीव वेळीच वाचावा, यादृष्टिने राष्ट्रीय महामार्गावरील देवरी येथे ट्रॉमा सेंटर तयार करण्यात आले आहे. सुरुवातीच्या काळात नेतेमंडळीने याचे मोठे भांडवल केले होते. मात्र, केंद्र तयार झाल्यापासून या केंद्राला घरघर लागली. अपुरी साधनसामुग्री यामुळे येथे प्राथमिक उपचारानंतर रेफर टू गोंदिया आणि रेफर टू नागपूर अशीच स्थिती सध्या सुरू आहे. त्यामुळे अपघातग्रस्तांसाठी महत्त्वाचे असलेले गोल्डन अवर धोक्यात आले आहेत. ट्रॉमा केअर म्हणजे शरीराला आघात झाल्यास करण्यात येणाऱ्या उपचाराचे केंद्र अर्थात हॉस्पिटल होय. शासनाने अनेक ठिकाणी ट्रॉमा केअर सुरू केली आहेत. जेणेकरून गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना मोफत किंवा अल्पदरात उपचार उपलब्ध व्हावेत.

अपघातातील जखमींवर त्वरित उपचार करणे शक्य व्हावे, या उद्देशाने अत्याधुनिक ट्रॉमा सेंटरचा संकल्प २०१३ मध्ये सोडण्यात आला. द्रुतगती मार्ग आणि राष्ट्रीय महामार्गावरील अपघात कमी कसे करता येतील, या अनुषंगाने योजना आखण्यात आली. तसेच अपघातातील जखमींवर त्वरित उपचार होण्याच्या उद्देशाने ट्रॉमा सेंटर कार्यरत राहील, यासाठीचा आराखडा मंजूर करण्यात आला. रुग्णवाहिका अपघातग्रस्तांना एका तासाच्या आत मदतीसाठी उपलब्ध होतील, असे आश्वासनही त्या वेळी देण्यात आले होते. तोच उद्देश डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय महामार्गावरील देवरी येथे देखील ट्रॉमा सेंटर उभारण्यात आला.

ट्रॉमा सेंटरला मंजुरी मिळाल्यानंतर स्थानिक नेते आणि पुढाऱ्यांनी आपण खूप मोठे काम केल्याचा आव आणून पोस्टरबाजी देखील केली होती. मात्र, त्यांचा तो उत्साह औटघटकेचा ठरला. रुग्णालयातील अपुरी व्यवस्था, साधनसामुग्री यामुळे अपघातानंतर गोल्डन अवरमध्ये रुग्णाला मिळणाऱ्या सुविधा येथे मिळू शकत नाही. परिणामी, असलेले मनुष्यबळ कसेबसे प्राथमिक उपचार करून रुग्णाला गोंदिया किंवा नागपूरला रेफर करतात. रुग्णाचा जीव वाचावा, या उद्देशाने सुरू केलेले सेंटर केवळ नावालाच उरले असल्याचे सद्यस्थितीत दिसून येत आहे.

पोलिस भरती अर्जासाठी मुदतवाढ,१५ डिसेंबरपर्यंत

मुंबई- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पोलिस भरतीचा अर्ज भरण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ जाहीर केली आहे. ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरताना सर्व्हर डाऊन असल्याने राज्यातील अनेक उमेदवारांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत याबद्दल माहिती दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आतापर्यंत आमच्याकडे ११ लाख ८० हजार अर्ज आलेले आहेत. तथापि काही ठिकाणांहून ही तक्रार येते आहे की, तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे राज्यातील पोलिस भरतीसाठी अर्ज सादर करण्यास १५ डिसेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

वाघांच्या अवयवाची तस्करी;आरोपींना कोठडी

भंडारा: वनविभागाअंतर्गत नाकाडोंगरी वनपरिक्षेत्रातील गोबरवाही येथे वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून वाघांची १५ नखे, तीन सुळे आणि दहा दात यासह सुमारे पाच किलो हाडे आणि दुचाकी वाहन जप्त करण्यात आले. यावेळी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले.वाघांच्या अवयवाची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती वनखात्याला मिळाली. यानंतर बनावट ग्राहक तयार करुन गेल्या दोन दिवसांपासून वनाधिकाऱ्यांनी आरोपीसोबत चर्चा सुरू ठेवली.

शनिवार, १९ नोव्हेंबरला आरोपीने विक्रीची तयारी केली. यादरम्यान नागपूर व भंडारा वनविभागाने संयुक्त पथक तयार करुन सापळा रचला. यावेळी आरोपी संजय पुस्तोडे व राम ऊईके यांना ताब्यात घेण्यात आले.

वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या विविध कलमांन्वये वनगुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्रादेशिक वनखात्याचे मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, उपवनसंरक्षक डॉ. भारत सिंह हाडा, भंडारा उपवनसंरक्षक राहूल गवई यांच्या मार्गदर्शनात विभागीय वनाधिकारी (दक्षता) पी.जी. कोडापे, सहाय्यक वनसंरक्षक नरेंद्र चांदेवार, संदीप गिरी, साकेत शेंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी संजय मेंढे, पी.एम. वाडे, वनरक्षक तावले, पडवळ, जाधव, शेंडे यांनी सापळा यशस्वी केला.

द बर्निंग ट्रक; लाखनी उड्डाणपुलावरील थरार

लाखनी- पहाटे दोन वाजताची वेळ. थंडीमुळे सर्वत्र शुकशुकाट. लाखनी उड्डाणपुलावर वाहनांची तुरळक गदी. अशातच, एक ट्रक उड्डाणपुलावर धावत असतानाच अचानक पेट घेतो. पाहता पाहता ट्रकला लागलेली आग रौद्ररूप धारण करते. जिल्ह्यातील लाखनी उड्डाणपुलावर सोमवारी पहाटे दोन वाजताच्या सुमारास बर्निंग ट्रकचा थरार अनेकांनी अनुभवला. किराणा साहित्य आणि ऑईल पेंट वाहून नेणा-या एका ट्रकने अचानक पेट घेतला.घटनेची माहिती अग्निशमन विभागाला देण्यात आली. अग्निशमन विभागाच्या अधिकारी-कर्मचा-यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

हंसराज अहीर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी

चंद्रपूर :- पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री तथा भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष हंसराज अहीर यांची राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी महामहिम राष्ट्रपती यांचे व्दारा निवड करण्यात आली आहे. आपल्या राजकीय कारकिर्दीमध्ये हंसराज अहीर यांनी चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे तब्बल ४ वेळा प्रतिनिधीत्व केले असुन केंद्र सरकारच्या सामाजिक हिताशी निगडीत अनेक महत्वपुर्ण समित्यांवर आपल्या संसदीय कारकिर्दीत उल्लेखणीय कार्य केले आहे.

राजकारणाला सामाजिक जोड देत हंसराज अहीर यांनी आपल्या प्रभावी संघटनात्मक कार्याव्दारे ओबीसी, भटके विमुक्त, अल्पसंख्यक समुदायातील मोठ्या वर्गाला भाजपाशी जोडण्याचे भरीव कार्य केले आहे. त्यांनी आपल्या उज्वल संसदीय कार्यातून गरीब, शोषित, कष्टकरी, शेतकरी, काम गार व अन्य घटकांच्या सामाजिक उत्थानासाठी विशेष प्रयत्न करित न्याय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीयउपाध्यक्ष पदाची जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे सांभाळून त्यांनी मागासवर्गीय समाजाला त्यांच्या न्याय हक्काची वेळोवेळी जाणीव करुन देत त्यांचे संघटन उभे करण्यात महत्वपुर्ण कार्य केले. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची तसेच विस्तृत अनुभवाची तसेच प्रत्येक जबाबदारीला न्याय देण्याची क्षमता ठेवणाऱ्या या नेतृत्वाची दखल घेत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.

हंसराज अहीर यांची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वच स्तरातुन स्वागत करण्यात येत आहे. या निवडीबद्दल हंसराज अहीर यांनी महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू जी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जी, भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा जी, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी जी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जी यांचे विशेष आभार मानत केंद्रीय नेतृत्वाने सोपविलेल्या या जबाबदारीला योग्य न्याय देवू असा विश्वास व्यक्त केला आहे.

आरटीई फाउंडेशनचे उपशिक्षणाधिकारी(प्राथ.)यांना निवेदन

गोंदिया : आरटीई फाउंडेशन जिल्हा गोंदिया कार्यकारिणी द्वारे उप शिक्षणाधिकारी जी.प.गोंदिया यांना खाजगी संस्थांना असलेल्या समस्यांचे निराकरण करण्याबद्दल चे स्मरणपत्र देण्यात आले. शिक्षण विभागाकडून खाजगी संस्था संचालकांचा खेळ मांडल्याचे दृश्य दिसून येत आहे हा खेळ ताबडतोब थांबवून खाजगी संस्था संचालकांची मदद शिक्षण विभागाने करावी व २०१२-१३ पासून प्रलंबित असलेली आरटीई चि प्रतिपूर्ति त्वरित संस्थांना देण्यात यावी. या पूर्वी दोन वेळा शिक्षणाधिकारी तसेच जी. प. अध्यक्ष यांना आरटीई फाउंडेशन जिल्हा गोंदिया यांच्याकडून निवेदन देण्यात आले आहे.

सत्र २०२२-२३ मध्ये उपरोक्त प्रतिपूर्ति शाळांना देण्यात आली नाही तर गोंदिया जिल्ह्यातील संपुर्ण खाजगी संस्था संचालकांना कडून सत्र २०२३-२४ चे आरटीई प्रवेश घेतले जाणार नाही असे निवेदन देण्यात आले. तसेच जुन्या शाळेतून टीसी न घेऊन जाता दुसऱ्या शाळेत कसे प्रवेश दिले जाते. व गट साधन केंद्र यांच्याकडून त्यांना कसे ऑनलाइन अपूवल दिले जाते. याचे समाधानकारक मार्ग कसे काढता येईल यावर शिक्षणाधिकारी यांनी विचार करावा. त्याचप्रमाणे मा. शिक्षणाधिकारी यांनी पालकांकरिता टीसी काढण्याची एक ठराविक कालावधी निश्चित करून जुन्या शाळेची शिल्लक असलेली शुल्क जमा केल्यानंतर टीसी पालकांना देण्यात यावी, अशी मागणी आरटीई फाऊंडेशन जिल्हा गोंदिया कार्यकारिणीद्वारे करण्यात आली. प्रतिवेदन देते वेळी आरटीई फाउंडेशनचे जिल्हा अध्यक्ष प्रा.आर.डी.कटरे, सतीश बन्सोड, पंकज सराफ, विलास नागदेवे, डॉ. सुजीत टेटे, वाय.टी.कटरे, संतोष राऊत, शिवेंद्र येळे, हिमांशू बिसेन, स्वप्निल पारधी, भुवन बिसेन, खलील खान पठाण, मेघा बिसेन, प्रकाश पंचभाई, नरेश शहारे, राजेन्द्र सोनवाणे आदि उपस्थित होते.

कुपोषित बालके बीजीडब्ल्यू रुग्णालयात वेटींगवर

गोंदिया : कुपोषणाचा डाग पुसून काढण्यासाठी सरकारने पुनर्वसन पोषण केंद्र सुरू केले आहेत. गोंदियात बाई गंगाबाई महिला व बाल रुग्णालयातून हे केंद्र चालविले जात आहे. मात्र, पुरेशा सुविधा नसल्याने कुपोषित बालकांना औषधोपचारासाठी किंबहुना सेवेचा लाभ घेण्यासाठी वेटींगवर राहावे लागत आहे. नक्षलग्रस्त गोंदियात आरोग्य व्यवस्थेचे कसे धिंडवडे निघाले आहेत, याचे हे ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल.

जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या काही कमी नाही. ही संख्या कमी नव्हे, तर कुपोषणाचा लागलेला डाग पुसून काढण्यासाठी शासनस्तरावर उपाययोजना आखल्या गेल्या आहेत. त्यानुसार, सरकारकडून योग्य उपचार व देखभाल केली जाते. काही कुपोषित बालकांचे वजन इतके कमी असते की, त्यांना पोषण आहार तसेच माता-पित्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता असते. कमी वजन असलेल्या कुपोषित बालकांचे वजन वाढविण्याच्या उद्देशाने येथील बाई गंगाबाई महिला व बाल रुग्णालयात पोषण पुर्नवसन केंद्र २०११ मध्ये सुरू करण्यात आले. या पोषण पुर्नवसन केंद्रात फक्त १० मुलांची भरती करण्याची सुविधा उपलब्ध आहे. बालके भरती झाल्यास त्यांना १४ दिवस भरती राहावे लागते. त्यामुळे दररोज १० ते १५ कुपोषित बालकांना भरती न करताच परतावे लागत आहे. काहींना वेटींगवर दोन ते तीन दिवस राहावे लागत आहे. परिणामी, वेळेवर मार्गदर्शन व पोषण आहार न मिळाल्यामुळे कुपोषित मुलांच्या संख्येत वाढ होत आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत पोषण पुर्नवसन केंद्रात १२० बालकांना सेवा दिली आहे. केंद्रात आलेल्या प्रत्येक बालकांची काळजी घेतली जाते. खाटा उपलब्ध नसल्यास कुपोषित मुलांना तारीख दिली जाते. खाटांची संख्या वाढली तर सुविधा देण्यात सोपे जाईल.

-डॉ. अनिल परियाल, मेडिकल ऑफिसर, पोषण पुर्नवसन केंद्र, गोंदिया.

संपुर्ण भारत बंद मध्ये सिंदखेडराजाही कडकडीत बंद

सिंदखेडराजा- मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे राष्ट्रीय पिछडा(ओबीसी) वर्ग मोर्च्याचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांच्या नेतृत्वात पुकारण्यात आलेल्या भारत बंद मध्ये सर्व पक्षीय नेतृत्वांनी पुढाकार घेवून कडकडीत बंद पाळण्याचे आवाहनावर व्यापारी प्रतिष्ठांनानी उत्स्फूर्त बंद पाळून सहकार्य केले.

भारत बंद हा ओबीसींना संख्येऐवढे ५२ % प्रतिनिधित्व देण्यात यावे,ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी,शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देण्यात यावे,खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्यात यावे,मजूरांविरोधातील शोषणकारी कायदे रद्द करावे,ईव्हीएममुळे निवडणूकीत होणारे घोळ थांबविणे,जुनी पेन्शन सुरू करण्यात यावी,आरक्षण बॅकलॉग व नवे आरक्षण लागू करण्यासाठी अधिनियमन कायदा करण्यात यावा,ओबीसी-एससी-एसटी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप पुर्ववत लागू करावी,छत्रपती शिवाजी महाराज व महापुरुषांची बदनामी करणाऱ्यावर कडक कारवाई करावी व ईतर मागण्यांसाठी बंद करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

न्याय,स्वातंत्र्य,समानता व बंधुता या तत्वांचा प्रत्येकाने अंगीकार करावा-निखिल पिंगळे

गोंदिया : सर्वसमावेशक व सर्व न्यायी राज्य घटनेमुळेच भारताची जगात वेगळी ओळख आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला हे संविधान दिले आहे. आजचा दिवस हा भारतीयांसाठी अभिमानाचा दिवस असून संविधानाने दिलेल्या सर्वांना न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता या तत्वांचा प्रत्येकाने अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी केले. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने आयोजित संविधान यात्रा कार्यक्रमात ते बोलत होते.

सामाजिक न्याय विभागामार्फत २६ नोव्हे. २०२२ (संविधान दिन) ते ६ डिसे. २०२२ (महापरिनिर्वाण दिन) या कालावधीमध्ये समता पर्व कार्यक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आज २६ नोव्हे. २०२२ रोजी "संविधान दिना" निमीत्त सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा, जयस्तंभ चौक, गोंदिया येथून प्रभात फेरी काढण्यात आली.

प्रभात फेरीचे उद्घाटन उपायुक्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती राजेश पांडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रभात फेरीचा समारोप मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, गोंदिया येथे करण्यात आला. समारोप कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती राजेश पांडे होते. विशेष अतिथी म्हणुन विनोद मोहतुरे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, अजय भुसारी, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गोंदिया (ग्रामीण), डॉ. प्रशांत मेश्राम, प्रा. डॉ. दिशा गोडाम, संविधान जनजागृती अभियान समन्वयक, श्रीमती श्रृती डोंगरे, नेहरू युवा केंद्र, गोंदिया इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपुर्ण आयोजन श्री. सावरबांधे, गृहपाल, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, गोंदिया यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती स्वाती कापसे, समाज कल्याण निरिक्षक व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अतुल सतदेवे, संयोजक, संविधान मैत्री संघ यांनी केले.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात भारतीय संविधान दिन

गोंदिया : शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया येथे भारतीय संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करुन अधिष्ठाता, डॉ. कुसुमाकर घोरपडे यांचे प्रमुख उपस्थितीत संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमात अधिष्ठाता, डॉ. कुसुमाकर घोरपडे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर अधिष्ठाता भारतीय संविधान दिन व उद्देशिका याबाबत आपले विचार व्यक्त केले. भारतीय संविधान तयार करण्याकरीता मसुदा समिती गठीत करण्यात आली होती, त्या मसुदा समितीने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचा मसुदा समितीपुढे सादर केला व त्यास सदर दिवशी स्विकृत करण्यात आले. त्यानिमित्त भारतात संविधान दिन २६ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येतो. भारतीय संविधानाचे तत्व व उद्देश हे थोडक्यात सामान्य नागरिकांस कळेल असे आशय-सार म्हणजे भारतीय संविधानाची उद्देशिका होय. कार्यक्रमात अधिष्ठाता तसेच उपस्थित सर्व अधिकारी- कर्मचारी तसेच वैद्यकिय शिक्षण घेणारे विद्यार्थीवर्ग यांचेकडून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच मृत पावलेल्या नागरिक यांचे स्मरणार्थ कार्यक्रमात उपस्थित अधिकारी, कर्मचारी व वैद्यकिय शिक्षण घेणारे विद्यार्थीवर्ग यांनी मौन पाळुन श्रध्दांजली अर्पण केली.

सदर कार्यक्रमात डॉ. योगेश गणोरकर, सहा. प्राध्यापक डॉ. रितेश बोदडे, सहा. प्राध्यापक, शल्य चिकित्साशास्त्र विभाग, अधिपरिचारीका मिनाक्षी बिसेन, सहा. परिचारीका गिता यादव, कृष्णा इंगोले, शैलेद्र बन्सोड, सोपान दांदडे, सचिन ढोले, आशिष मेश्राम, रोशन मेश्राम, हरीचंद्र कटरे, दिलीप दगडकर, राहुल जाधव तसेच समाजसेवा अधिक्षक विकम लांजेवार, गोपाली खोटे व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकम लांजेवार, समाजसेवा अधिक्षक यांनी केले. तसेच सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता सचिन ढोले, गोपाली खोटे यांनी परिश्रम घेतले.

जिल्हा न्यायालय येथे संविधान दिवस साजरा

गोंदिया : २६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान दिनानिमित्त जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देश पत्रिकाचे वाचन व संविधान फलकाचे उद्घाटन न्यायालयातील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय ए. टी. वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले..

सदर कार्यक्रम न्यायाधीश पिंपळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमात गोंदिया न्यायालयातील सर्व न्यायाधीश वर्ग व जिल्हा न्यायालय गोंदियातील सर्व कर्मचारी तसेच एडवोकेट मेठी, एडवोकेट शबाना अन्सारी, एडवोकेट मंगला बनसोड, एडवोकेट बोंबर्डे, एडवोकेट चुटे, एडवोकेट खंडेलवर उपस्थित होते.

खंडणी वसुलीप्रकरणी १० नक्षल समर्थकांना अटक

गडचिरोली: नक्षलवादी असल्याचे सांगून बांधकाम कंत्राटदाराकडून ७० लाख रुपयांची खंडणी वसूल करण्याचा प्रयत्न करणाऱ्या १० नक्षल समर्थकांना अहेरी तालुक्यातील पेरमिली पोलिसांनी अटक केली.चैनू आत्राम (३९), दानू आत्राम (२९) दोघेही रा. आलदंडी, शामराव वेलादी (४५), संजय वेलादी (३९), किशोर सोयाम (३४) तिघेही रा.चंद्रा, बाजू आत्राम (२८), रा. येरमनार टोला, मनिराम आत्राम (४५) रा. रापल्ले, जोगा मडावी (५०) रा. येरमनार टोला, लालसू तलांडे (३०) रा. येरमनार व बजरंग मडावी (४०) रा. मल्लमपल्ली ता. अहेरी, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. काही जणांनी नक्षल्यांच्या वेशभूषेत ५ नोव्हेंबरच्या रात्री बांडिया नदीवर सुरु असलेल्या पुलाच्या बांधकाम स्थळी जाऊन तेथील कर्मचाऱ्याचे अपहरण केले होते.त्यानंतर त्यास ७० लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास बांधकाम साहित्याची जाळपोळ करून जीवे मारण्याची धमकीही दिली. यासंदर्भात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली असता ते सर्वजण नक्षल समर्थक असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी उपरोक्त १० जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून नक्षल गणवेश, भरमार बंदुका व अन्य साहित्य ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

टपाल खात्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सावळागोंधळ

गोंदिया:- भारतीय टपाल खात्याच्या नागपूर ग्रामीण विभागात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची चर्चा समोर आली आहे.

माहितीनुसार, गेल्या सहा महिन्यापूर्वी केंद्र शासनाच्या "बँक आपल्या दारी' या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला कॅशलेस आणि बँकिंग सुविधेशी जोडण्यासाठी सुमार चारशेवर नवीन शाखा डाकघर? उघडण्यात आली आहेत. या मध्ये कर्मचारी भरती प्रकिया ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली होती. या निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना सुमाले १७ ते २० हजार रुपये दरमहा वेतन दिले जात आहे. परंतु, या कम चाऱ्यांना कार्यालय व्यवस्थितपणे सुरू ठेवण्यासाठी कोणतेही मशिन वा साहित्य उपलब्ध करून देण्यात आले नाही, हे विशेष.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित विभागाने गेल्या ६ महिन्यापूर्वी खरेदी केलेल्या टेबल, खूर्च्या, आलमारी या गोंदिया आणि भंडारा प्रधान डाकघर येथे पडून आहेत. या नवीन कर्मचाऱ्यांना नजिकच्या शाखा डाकघर येथे उपस्थित दाखवून गेल्या सहा महिन्यापासून वेतन अदा केला जात आहे. या नवीन शाखा डाकघरांचे नियंत्रण करण्यासाठी गोरेगाव, देवरी, आमगाव आणि तिरोडा येथे नवीन उपविभागीय कार्यालये तयार करण्यात आली आहेत. याशिवाय साकोली, गोंदिया, तुमसर आणि भंडारा येथे पूर्वीपासूनच उपविभागीय कार्यालये कार्यरत आहेत. या नव्याने सुरू करण्यात आलेल्या शाखा डाकघरांना व्यवस्थितरीत्या संचालित करण्याचे कार्य उपडाकघरांमार्फत केल्या जाते.

असे असले तरी, सरकार दरबारी उलटी गंगा वाहताना दिसत आहे. उपडाकघर? सुरू करण्याचे सोडून संबंधित विभाग उपविभागीय कार्यालये सुरू करण्यात स्वारस्य घेताना दिसत आहे. नव्याने सुरू करण्यात आलेल्या शाखा डाकघरांचे भार हे जून्या उपडाकघरांच्या माथी मारले जात असल्याचे सांगण्यात येत आहे. परिणामी, या उपडाकघरांवर कामाचा बोजा हा पाचपट वाढल्याचे दिसून येत आहे. यामुळे या दिलेल्या प्रस्तावामुळे उपडाकघरांतील कामे व्यवस्थितरीत्या होणे अशक्य असल्याचे बोलले जात आहे. याशिवाय गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील उपडाकघरातील कर्मचारी संख्या सुमारे ३० ते ५० टक्क्यांनी पूर्वीच कमी आहे. या कार्यालयातील निम्म्याहून अधिक संगणक, प्रिंटर, पासबुक प्रिंटर नादुरुस्त आहेत. याशिवाय नोट मोजण्याच्या मशिन ह्या केवळ प्रधान डाकघर वगळता इतर सर्व ठिकाणी बंद पडून आहेत. अनेक ठिकाणी संगणकांना बॅटरी बॅकअपहा एक मिनिटाचा सुद्धा नाही. लाखोंचे जनरेटर हे वर्षानुवर्षे धूळखात पडून आहेत.

आधीच ४० टक्के डाकसहाय्यक कर्मचाऱ्यांचा तुडवडा असताना या दोन्ही जिल्ह्यातील सुमारे ८० वर कर्मचारी नागपूर शहर येथे स्थानांतरित करण्यात आले आहेत. हे स्थानांतरित करण्यात आलेले कर्मचारी आपल्या वरिष्ठांच्या आशीर्वादाने परत ग्रामीण विभागात प्रतिनियुक्ती मिळवत टीएडीएच्या नावावर सरकारच्या मोठ्या निधीची मलई खात आहेत.

यापूर्वीच्या नियमानुसार, पोस्टमनच्या रिक्त झालेल्या जागांवर त्याच विभागातील सर्वात वरिष्ठ ग्रामीण डाकसेवकांची नियुक्ती करून पोस्टमन म्हणून बढती दिल्या जात होती. अशा कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या चुकांसाठी त्यांनाच जबाबदार धरले जात होते. परंतु, आता केवळ तोंडी आदेशानुसार ग्रामीण डाकसेवकांना डावलून ३८४ रुपये दैनिक वेतनावर बाहेरील व्यक्तींना डाकवितरणाचे काम दिले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये ही बाहेरून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडून एखादे पार्सल, रजिस्ट्री, स्पीडपोस्ट वा मनिऑर्डर गहाळ झाला, तर याचा त्रास ग्राहकांना सहन करावा लागण्याची शक्यता बळावली आहे.

नागपूर विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र सुमारे २४० किलोमीटर लांबीपर्यंत असल्याने अधिकाऱ्यांना आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांवर वा कार्यावर नियंत्रण ठेवणे अशक्यप्राय आहे. परिणामी, मुंबई-नागपूर येथील अधिकारी हे निरीक्षणासाठी कमी आणि भ्रमंती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर येऊन भत्त्याच्या नावावर सरकारची लूट करीत असल्याची चर्चा डाक विभागात आहे. उपविभागीय डाक निरीक्षक आणि त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी लाखोचा निधी टीएडीएच्या नावावर दिला जात आहे. यापेक्षा अर्ध्या खर्चामध्ये प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांना भाड्याने वाहन उपलब्ध करून मोठ्या निधीची बचत करुन डाकघरांना मूलभूत सुविधा सहज पुरविल्या जाऊ शकतात, असेही सांगण्यात येत आहे.

रस्ते अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करा-नयना गुंडे

नागरिकांनो वाहतूक नियमांचे पालन करा, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती बैठक

गोंदिया : रस्ते अपघातांची व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या ही बाब निश्चितच गंभीर असून रस्ते सुरक्षेची व्याप्ती व अपघातामुळे होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशा सूचना जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी केल्या. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, कार्यकारी अभियंता अब्दुल जावेद, कार्यकारी अभियंता एन. टी. लभाने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद खंडाते, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बी. टी. वरतानी, पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा महेश बनसोडे, मोटर वाहन निरीक्षक अतुल पवार, महामार्ग पोलीस प्रशांत भुते, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी एम. एस. निंबाळकर व विपीन पांडेय या बैठकीला उपस्थित होते.

जिल्ह्यात एकूण आठ ब्लॅक स्पॉट म्हणजे अपघात प्रवण स्थळ असून जानेवारी ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत जिल्ह्यात एकूण २०१ रस्ते अपघात झाले. या अपघातात ११८ व्यक्तींचा मृत्यू झाला तर १४८ गंभीर जखमी झाले. यात सर्वाधिक १०२ अपघात दुचाकी वाहनाचे आहेत. त्याखालोखाल ३६ ट्रक २७ कारचे अपघात आहेत. मागील तीन वर्षाच्या तुलनेत अपघातातील मृत्यूची संख्या कमी असली तरी चिंताजनक असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सन २०१९ मध्ये २६५अपघात १६० मृत्यू, सन २०२० मध्ये २१८ अपघात १४० मृत्यू व सन २०२१ मध्ये २५२ अपघात १३२ मृत्यू झाल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे यांनी दिली.

रस्ते अपघाताची आकडेवारी चिंताजनक असून अपघात कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिका?यांनी सांगितले. या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील अपघात प्रवण क्षेत्र निश्चित करण्यासाठी सर्व रस्त्यांचा नव्याने सर्व्ह करण्यात यावा. रस्तावर सूचना फलक लावावे, रस्ते दुभाजकाचा आढावा घ्यावा, रस्ते वळणावरील झाडी-झुडपे हटवावे व खड्डे बुजविण्यात यावेत यासह कायमस्वरूपी व तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक ही रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाची बाब असून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शालेय बस, स्कुल व्हॅन, तीन चाकी रिक्षा इत्यादी वाहनातून आसन क्षमतेपेक्षा जास्त विद्याथी धोकादायक पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या विरुद्ध विशेष तपासणी मोहिम नियमितपणे राबविण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. अपघात झालेल्या व्यक्तीला वैद्यकीय सुविधा तातडीने मिळायला हवी असे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की, रुग्णवाहिका १०८ सह तालुका आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका तातडीच्या प्रसंगी उपलब्ध करून देण्यात याव्यात. रस्ता सुरक्षा ही सामूहिक जबाबदारी असून नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. समिती सदस्यांनी सुद्धा याबाबत आपल्या सूचना व निरीक्षण समितीला वेळोवेळी कळवावे. आपला जिल्हा अपघातमुक्त करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

६९ नमुने प्रयोगशाळेत पाठविले

गोंदिया: या वर्षात गोवरचे ३ तर रुबेलाचे ३ रुग्ण आढळल्याने खळबळ माजली आहे. आरोग्य विभाग ॲक्शन मोडवर आले असून संशयीत ६९ जणांचे नमुने तपासणीसाठी हैदराबादला पाठविले आहे. तसेच गोवरची लक्षणे आढळल्यास आरोग्य विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. राज्यात काही भागात गोवर विषाणू संसर्ग काही रुग्ण आढळून आले आहेत. मुंबई वरुन गोंदिया जिल्ह्यात कामास्तव लोकांचे ये-जा सुरु असते. त्यामुळे गोवर विषाणू संसर्ग होण्याची शक्यता आहे. यापूर्वी जिल्ह्यात गोवरचे तीन व रुबेलाचे ४ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे राज्यात गोवर विषाणूचा वाढता संसर्ग पाहता आरोग्य विभाग सजग झाले आहे. जनजागृतीसह खबरदारीचे उपाययोजना केल्या जात आहे. यातंर्गत आतापर्यंत ५५७ मुलांना गोवर, रुबेलाचा पहिला डोस दिला आहे. दुसरा डोज ३५७ मुलांना दिला आहे.

जिल्ह्यात एम.आर.१ लसीकरणाचे चे १४० (तालुकानिहाय आमगाव ७०, सडक अर्जुनी २३, व व अर्जुनी मोरगाव ४७) एम.आर.२ लसीकरणाचे चे ३८ (आमगाव ३८) बालकांनी लसीकरण घेतलेले नाही. या सर्वांनी त्वरित आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविका/ आरोग्य सेविका यांच्याशी संपर्क साधुन लसीकरण करुन घेण्याचे आवाहन डॉ.नितीन वानखेडे व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. डी. बी. सुतार यांनी केले आहे.

खेळण्याकरिता बाहेर गेलेली चिमकुली बेपत्ता

भंडारा: खेळण्यासाठी घराबाहेर गेलेली आठ वर्षीय चिमुकली २४ तास लोटूनही परत आली नसल्याची खळबळजनक घटना पापडाखुर्द येथे उघडकीस आली. हिंस्त्र पशूचा हल्ला, अपघात किंवा घातपात, अशा विविध चर्चांना उधाण आले असून आज सकाळी जिल्हा पोलीस अधीक्षक लोहित मतानी तसेच इतर पोलीस अधिकारी या गावात दाखल झाले आणि ताबडतोब शोध मोहीम सुरूकेली आहे. साकोली तालुक्यात सानगडीजवळील पापडाखुर्द गावातील साडेआठ वर्षीय चिमुकली सोमवार सायंकाळपासून बेपत्ता आहे. जि.प. प्राथमिक शाळा पापडाखुर्द येथे ती इयत्ता तिसरीत शिकत होती. शाळेतून घरी आल्यावर ती खेळण्याकरिता बाहेर गेली. मात्र, काळोख पडून गेल्यावरही लेक घरी न परतल्याने कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी रात्रभर शोधाशोध केली.

गर्भवती मातांसाठी सुरक्षा कवच ठरली जननी सुरक्षा योजना



गोंदिया: गर्भवती महिला आणि माता यांच्या जननी सुरक्षा आरोग्यदायी जीवनासाठी देशभरात अनेक योजना राबविल्या जात आहेत. देशातील ग्रामीण आणि शहरी भागात राहणाऱ्या दारिद्रय रेषखालील कुटुंबामधील गर्भवती मातांना आर्थिक लाभ देण्यासाठी केंद्र शासनाने जननी सुरक्षा योजना एप्रिल २००५ यावर्षात सुरु केली. ही योजना गर्भवती व प्रसुत मातांसाठी सुरसुक्षा कवच ठरली आहे. योजने अंतर्गतग सन २०२२-२३ या वर्षात आतापर्यंत जिल्ह्यातील ५३३२ मातांना ३८ लाख ८६ हजार रुपयाचे अनुदान वितरीत करण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी दिली.

योजनेअंतर्गत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, दारिद्रय रेषेखालील मातांना मोफत प्रसूती सेवा आणि आर्थिक सहाय्य देण्यात येते. महिलांचे आरोग्य संस्थेमध्ये होणारे प्रसुतीचे प्रमाण वाढवणे तसेच माता मृत्यू व अर्भक मृत्युचेचेप्रमाण कमी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. दारिद्रय रेषेखालील सर्व गर्भवती महिला, माता तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील सर्व गर्भवती महिला, माता (दारिद्रय रेषेखाली नसलेल्या देखील) योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत. योजनेच्या लाभासाठी लाभार्थी महिलेचे वय प्रसवपूर्व नोंदणी करताना कमीतकमी १९ वर्षे असावे, योजनेचा लाभ २ जिवंत अपत्यांपर्यंतच देय आहे, ग्रामीण भागातील पात्रा लाभार्थी शासकीय, निमशासकीय आरोग्य संस्थेत प्रसूती झाली असल्यास प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसाच्या आत ७०० रुपये शहरी भागातील लाभाथीला ६०० रुपये धनादेश-शाद्वारे किंवा बँक खात्यात थेट जमा केले जाते.शहरी तसेच ग्रामीण भागासाठी दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यांची प्रसुती घरी झाल्यास ५०० रुपये, सिझेरीयन शस्त्रक्रिया झाल्यास १५०० रुपये देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शासकीय ग्रामीण व शहरी रुग्णालये, शासनमान्य खाजगी रुग्णालये या ठिकाणी जननी सुरक्षा योजनेचा लाभ मिळवता येतो. यासाठी रहिवाशी दाखला, शाळेचे प्रमाणपत्र,जात प्रमाणपत्र, आधार कार्ड सत्यप्रत, बँक पासबुक झेरॉक्स प्रत, जननी सुरक्षा कार्ड,फोटो आदी कागदपत्रे असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयातील आशा सेविका, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणीकरून अर्ज करता येते.

आणखी एक बळी जाण्याच्या मार्गावर

गोंदिया: जिल्ह्यात एकीकडे सारस सर्वंधनाच्या नावावर जिल्हा प्रशासनाच्या हालचाली सुरु असतानाच आठवडाभरापूर्वी

ङ्गतेफ दोघेही मुक्तपणे फिरत होते, निसर्गाच्या सानिध्यात विहार करत होते, पण अचानक वीज तारा आडव्या आल्या आणि दोघांचाही बळी गेला. गावकरी त्यांचा निष्प्राण देह बघतच राहिले. कुणालाही त्यावर विश्वास नव्हता, पण ते खरे होते. ङ्गप्रेमाचे प्रतीकफ अशी त्यांची ओळख आहे. तर त्याचा तपास पूर्ण होऊन भविष्यातील त्यांचे मृत्यू रोखण्यासाठी प्रयत्न होत नाही तोच शनिवारी पुन्हा एक निमवयस्क सारस पक्षी गंभीर अवस्थेत मिळाला. गोंदिया तालुक्यातील डांगुली गावालगतच्या शेतामध्ये हा पक्षी धडपडताना आढळून आला. जवळच काही अंतरावर काही अन्य पक्षी मृत अवस्थेत मिळालेली आहेत. प्राथमिक अंदाजानुसार, विषबाधेमुळे हा सारस पक्ष अत्यवस्थ झाला असावा, असे वाटते आहे. काही लोक पक्ष्यांची शिकार करण्यासाठी विषबाधा करून पक्षी मारतात, त्याकरिता ते काही ठराविक किटकनाशकांचा (organo-phosphate groupÀ`m किटकनाशकांचा) वापर करतात . यावर्षी गोंदिया जिल्ह्यात फक्त तीन सारस पक्ष्यांची घरटी मिळाली व त्यातून चार पिलांचा जन्म झाला. त्यातलेच एक पिल्लू गंभीर अवस्थेत आहे. अशा घटना आणि प्रकार बघता पुन्हा एकदा सारस संरक्षणातकरिता भक्कम तरतूद व उपाययोजना अंमलात आणण्याची गरज मानद वन्यजीव रक्षक सावन बाहेकर यांनी व्यक्त केली आहे.यावर्षी गोंदिया जिल्ह्यात फक्त ३ सारस पक्ष्यांची घरटी मिळाली व त्यातून ४ बच्ची तयार झाली होती. त्यापैकी हा १ बच्चा गंभीर अवस्थेत आढळला आहे. अशा घटना आणि प्रकार बघता सारस संरक्षणाकरिता भक्कम तरतूद व उपाययोजना अमलांत आणणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

उपसरपंच रवि तरोणे यांच्या पाठपुराव्याने इरीच्या ४० कुटुंबांना मिळाले राशन

गोंदिया : तालुक्याच्या इरी येथील माजी उपसरपंच रवि तरोणे हे सामाजिक व लोकहिताच्या कार्यासाठी नेहमी चर्चेत राहत असतात. असेच उत्तम कार्य गोरगरिबांना त्यांच्या हक्काचे राशन मिळावे यासाठी उपसरपंच रवी भाऊलाल तरोणे यांनी वर्षभर शासनाच्या दारी खटाटोप करून इरी येथील वंचित असलेल्या गोरगरिबांना राशन मिळवून दिले. इरी येथील ४० कुटुंबांना राशन सुरू झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत आहे. मागील वर्षी रवि तरोणे यांनी ५० गरजू कुटुंबांना राशन मिळवून दिले असे एकूण ९० गरजू कुटुंबांना राशन मिळवून दिले. घरची परिस्थिती हलाकीची असूनही गरजूंना शासनाच्या मोफत धान्य मिळत नव्हते. त्यातील काहींचे राशन कार्ड होते तर, काहींचे राशन कार्ड असूनही त्यांना योजनेचे धान्य मिळत नव्हते. मागील दहा ते पंधरा वर्षांपासून राशनसाठी त्यांची ओरड होती. गावाची जबाबदारी येऊन ठेपली तेव्हा उपसरपंच रवी तरोणे यांनी गावातील लोकांना शासकीय योजनांचा फायदा कसा देता येईल, यासाठी प्रशासनाच्या दरबारी फेरफटका मारला. ज्यांचे राशन कार्ड आहेत त्यांना राशन का मिळत नाही. त्यांच्या हक्काचे राशन जाते कुठे? कुणाचा राशन कार्ड नाही, अशा परिस्थितीत त्यांचे राशन कार्ड तयार करून दिले. अन्न पुरवठा निरीक्षक यांची भेट घेवून धान्य मिळवून दिले.

तलावांच्या जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय दुर्लक्षित

अधिकाऱ्यांचा वानवा, सहाय्यक आयुक्त कार्यालय प्रभारीच्या खांद्यावर

गोंदिया:- तलावांचा जिल्हा म्हणून नावलौकिक असलेल्या गोंदिया जिल्ह्यात मासेमारीला मोठा वाव आहे. परंतु मत्स्य व्यवसायाला सबळ करणाऱ्या तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने हा व्यवसाय दुर्लक्षित होत आहे. गोठणगाव व आंभोरा शासकीय बीज निर्मिती केंद्रासह सहाय्यक आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांचा वानवा असून मत्स्य व्यवसायावर शासनाचीच वक्रदृष्टी असल्याने सर्वत्र रोष व्यक्त केला जात आहे.

जिल्ह्यातील इटियाडोह व आंबोरा येथे शासकीय मत्स्यबीज निर्मिती केंद्र आहेत. इटियाडोह येथे मत्स्यबीज निर्मिती आणि आंभोराला संवर्धन केंद्राचे नाव देण्यात आले आहे.दोन्ही खासगी संस्थेला लीजवर देण्यात आले. तलावांचा जिल्हा असल्याने मासेमारी व्यवसायाला सुगीचे दिवस येतील असे स्वप्न जिल्हावासी बघत असतानाच शासन कर्मचाऱ्यांची पदे भरत नसल्याने या व्यवसायाचे खच्चीकरण होऊ लागले आहे.

गोठणगाव व आंभोरा या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी एक सहाय्यक मस्त्य व्यवसाय विकास अधिकाऱ्यांचे पद रिक्त असून लीजवर केंद्र दिल्यामुळे ते पद भरायला सुध्दा विभाग पुढे येत नाही. मत्स्य विभाग गोंदिया येथे सुद्धा सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय हे मुख्य पद गेल्या अनेक वर्षापासून रिक्त आहे.या पदाचा प्रभार सहाय्यक मत्स्य व्यवसाय अधिकारी सांभाळत आहेत. गोंदिया येथील मत्स्यव्यवसाय विभागात १९ पदे मंजूर असून आजच्या घडीला ११ पदे ही रिक्त आहेत.त्यातच तालुकास्तरावर कृषी विभागासारखा अधिकारी नसल्याने विभागाच्या योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी अडचणी येत आहेत.

मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी हे पद सुध्दा रिक्त आहे.मत्स्यक्षेत्रिकांची पदे रिक्त आहेत.विकास अधिकारी नाहीत. तलावांचा जिल्हा म्हणून लौकिक असलेल्या गोंदिया जिल्ह्यात मासेमारीला वाव असताना सुद्धा कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे या व्यवसायाला भरभराठी नाही. शासनच या व्यवसायाला अपंगत्व आणत असल्याचे दिसून येते.

जिल्ह्यातील आठ तालुक्यात शासकीय केंद्रासह मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांच्या माध्यमातून चालतो. १३३ मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था आहेत. एवढ्या संस्थाच्या सभासदांचा निर्वाह यावर असून सुद्धा शासनाची उदासीनता या व्यवसायाला दुबळा करीत आहे. पाटबंधारे विभागाचे ६६ तलाव आणि जिल्हा परिषदेचे १३७० तलावात हा व्यवसाय चालतो. २०२२ मध्ये जवळपास ६ हजार मॅट्रिक टन उत्पादन झाले.हेच उत्पादन ८-९ वर्षापुर्वी १० हजार मेट्रीक टन एवढे होते.आत्ता मात्र मनुष्यबळा अभावी यंत्रणाच दुबळी ठरत आहे.

जिल्ह्यातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था प्रगतिशील असल्याने या व्यवसायाला त्यांनी जिवंत ठेवले असून जिल्ह्यातील मत्स्यबिजांची अमरावती, गडचिरोली, पुणे येथे निर्यात होते. असे असतानाही शासनाने जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाकरिता ठोस क्रांतीसाठी प्रयत्नच केले नाही. उलट आमगाव तालुक्यातील उपकार्यालय बंद करण्यात आले. महत्त्वाच्या कर्मचाऱ्यांची पदेच रिक्त असल्याने व्यवसायाला पाठबळ मिळण्यास अडथळा निर्माण होत आहे. मत्स्य व्यवसायावर जिल्ह्यातील शेकडो कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असून या व्यवसायाला पाठबळ देण्याची गरज आहे. मच्छीमारांना प्रशिक्षणाची गरज आहे. शिवाय या व्यवसायासंबंधी अधिकाऱ्यांना जिल्हा भर दौऱ्यावर फिरण्यासाठी साधे शासकीय वाहन नाही. अनेक दिवसांपासून स्थायी कर्मचारी येथे नाहीत अशा समस्यांचा गर्तेत हा व्यवसाय सापडला असून जिल्हा विकासास पोषक ठरणाऱ्या मत्स्य व्यवसायावर शासनाचीच वक्रदृष्टी असल्याने हा व्यवसाय दुर्लक्षित होत असल्याचा आरोप नागरिक करू लागले आहेत. सध्या प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेतर्गत अनु,जाती, जमाती व महिलांना ६० टक्के अनुदान व इतरांना ४० टक्के अनुदानावर मत्स्यव्यवसायासाठी दिले जात असले तरी आधुनिक तंत्रज्ञानाची गरजही आहे.

मत्स्यव्यवसाय मुख्य उद्देश

सामाजिक व आर्थिक विकासात महत्वाचे स्थान
रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढविणारे क्षेत्र
प्रथिनयुक्त व कमी किंमतीत पोषक अन्न पुरवठा
मासळी निर्यातीद्वारे परकीय चलनात वाढ
सामाजिक व आर्थिक दुष्ट्या मासलेल्या जनसामान्यांना रोजगागाराचे व्यापक क्षेत्र

मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रमुख उद्दीष्टे

उपलब्ध जलसंपत्तीमधून अधिकाधिक मत्स्योपादन करने
मच्छिमार हे समाजातील दुर्बल गटातील असल्याने त्यांची आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणने.
मच्छिमारांना शिक्षण व प्रशिक्षण प्रदान करुन त्यांच्या कार्यक्षमतेच्या मर्यादा विकसीत करणे.

जिल्हा परिषद-पंचायत समिति असो. गोंदिया जिल्हाध्यक्षपदी पंकज रहागंडाले

गोंदिया : राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिति पदाधिकारी मार्फत संचालित जिल्हा परिषद-पंचायत समिति असोसिएसन(महा.) या संघटनेचा गोंदिया जिल्हा स्तरीय मेळावा नुकताच पार पडला. स्थानिक ग्रीनलैंड लॉन येथे आयोजित या मेळाव्याला मोठ्या संख्येत स्थानिक सर्वपक्षीय जि.प. व प.स. पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेचे संस्था अध्यक्ष कैलाश गोरे पाटिल, प्रदेश अध्यक्ष उदय बने, राज्य सरचिटणीस शुभाष घरत, राज्य उपाध्यक्षा सौ. सरिता गाखरे तसेच इतर राज्यस्तरीय पदधिकार्यांच्या उपस्थितीत आयोजित या सभेत विविध विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले व संघटनेच्या पुढील वाटचाली बाबद माहिती देण्यात आली.

यावेळी संघटनेची गोंदिया जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली. जिल्हा अध्यक्ष पदावर पंकज रहांगडाले यांची तर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून यशवंत गणविर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी रुपेश कुथे,योपेन्द्रसिंह टेंभरे, पूजा सेठ, सविता पुराम यांना जवाबदारी देण्यात आली. तसेच सचिवपदी अश्विनी पटले, एड.माधुरी रहांगडाले, उषा मेंढे, सरचिटणीस पदी सुरेश हर्षे, सल्लागार पदी लायकराम भेंडारकर, अनंदा वाढीवा, संदीप भाटिया, तालुका समन्वयक पदी मुनेश रहांगडाले, मनोजकुमार बोपचे, संगीता खोब्रागडे, राजेन्द्र गौतम, अंबिका बंजार, सविता कोडापे, प्रमिला गनवीर, कुंता पटले तसेच तालुका सहसमन्वय म्हणूक निरंजन उपवंसी, राजकुमार यादव, शलिंदर कापगते, नोहरलाल चौधरी, अनिल बिसेन, होमराज पुसतोडे, संतोष बोहरे, हुपराज जमईवार यांची निवड करण्यात आली.